सुविचार
स्वयं की खोज के लिए स्वयं के प्रति सच्चा बनना पडेगा ।
(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शनिवार दि. २० एप्रिल २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१५१ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# मराठी म्हणीचा वापर करुन पंतप्रधानांची विरोधकांवर बोचरी टीका

मुंबई : वर्धा – महाराष्ट्र आणि देशातील पहिल्या टप्प्यातील मतदानाला आज सुरुवात झाली असून विदर्भातील वर्धा, नागपूर, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात मतदान करण्यात आले. यादिवशी विदर्भात आयोजित केलेल्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हजेरी लावली. चैत्र एकादशीनिमित्ताने पंढरपूरच्या विठुरायाला वंदन करतो, असे म्हणत पंतप्रधानांनी आपल्या भाषणाला सुरवात केली. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी पुन्हा एकदा मराठी म्हणीचा वापर करत काँग्रेसवर बोचरी टीका केली.



आपल्या देशात २०२४ पूर्वी नैराश्याचे वातावरण होते. वीज, पाणी, रस्त्यांच्या अनेक गावात समस्या होत्या. मात्र, गेल्या १० वर्षात आपल्या सरकारने २५ कोटी भारतीयांना गरिबातून बाहेर काढले. देशात ५० कोटींहून अधिक बँक खाते नव्याने उघडले आहेत. आता, विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्राचं स्वप्न दूर नाही. मोदी जो गॅरंटी देतो, त्यासाठी दिवसरात्र खपायला तयार आहे. असे मोदी यांनी सभेत म्हटले.

काँग्रेस आघाडीवर घाणाघात

काँग्रेस आणि इंडी आघाडी नेहमीच विकासविरोधी आणि शेतकरी विरोधी राहिली आहे. त्यामुळेच, देशातील शेतकऱ्यांची (पान २ वर)

# अमित शहा यांचा उमेदवारी अर्ज दाखल



गांधीनगर : आज देशातील १०२ लोकसभा मतदारसंघासाठी पहिल्या टप्प्यातील मतदान होत आहे. एकीकडे मतदानाची धुम सुरू आहे, तर दुसरीकडे अनेक उमेदवार पुढील टप्प्यासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल करत आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीदेखील आज, शुक्रवार दि. १९ एप्रिल रोजी गुजरातच्या गांधीनगर लोकसभा मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

अर्ज भरल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना अमित शाह म्हणाले की, आज मी गांधीनगर मतदारसंघातून उमेदवारी दाखल केली. नरेंद्र मोदी स्वत: गांधीनगर मतदारसंघाचे मतदार आहेत. शिवाय लालकृष्ण अडवाणी, अटल बिजारी वाजपेयी यांनी या मतदारसंघाचे नेतृत्व केले आहे. मी गेली ३० वर्षे या मतदारसंघातून आमदार आणि खासदार राहिलो आहे, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. या निवडणुकीत नरेंद्र मोदींना प्रचंड बहुमताने तिस-यांदा पंतप्रधान करण्यासाठी संपूर्ण देश उत्सुक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने संपूर्ण नावलौकिक मिळवले आहे. यूपीए सरकारने निर्माण केलेली (पान २ वर)

# पहिल्यांदाच चारधामसाठी चार्टर्ड हेलिकॉप्टर सेवा होणार सुरू

उत्तराखंड : उत्तराखंडमध्ये १० मेपासून सुरू होणाऱ्या चारधाम यात्रेचा उत्साह यंदाही मोठ्या प्रमाणात दिसून गेल्या चार दिवसांत १४ लाखांहून जास्त लोकांनी नोंदणी केली. गेल्या चार महिन्यांत ५५ लाख भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला आहे. त्यात पहिल्यांदाच चारधामसाठी चार्टर्ड हेलिकॉप्टर सेवा सुरू होणार आहे. त्यात चार लोक एका धामची यात्रा साडेतीन लाख रुपयांत करू शकतील. चारधामसाठी हेलिकॉप्टर घेतल्यास प्रती व्यक्ती १.९५ लाख एवढे भाडे मोजावे लागेल. भाड्यात ये-जा, मुक्काम, भोजनाचा समावेश आहे. हेलिकॉप्टरही तेथेच राहील. एका दिवसात परतीचे भाडे १.०५ लाख असणार आहे, अशी माहिती उत्तराखंड नागरी उड्डाण विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सी.रविशंकर यांनी दिली.

केदारनाथपर्यंत सुपरफास्ट नेटवर्क केदारनाथच्या मार्गावर ४ जी व ५ जी नेटवर्क उपलब्ध असेल. त्यासाठी ४ टॉवर लावण्यात आले आहेत. गेल्या वर्षी या मार्गावर काही ठिकाणी नेटवर्क असायचे. मंदिर परिसरात वायफायचा वापर करायचा झाल्यास सरकारी पावती काढावी लागायची. परंतु आता तेथे सुपरफास्ट नेटवर्क (पान २ वर)

# राज्यात पहिल्या टप्प्यात ५४. ८५टक्के मतदान देशात ५९.७१ टक्के मतदारांनी बजावला हक्क

मुंबई (प्रतिनिधी) : लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची निवडणूक शुक्रवारी पार पडली आहे. काही घटना वगळता सर्वत्र शांततेत मतदान झाले आहे. २१ राज्य आणि केंद्र शासित प्रशांतील १०२ मतदारसंघांमध्ये मतदान पार पड़ले आहे. यापैकी पश्रि्चम बंगालमध्ये सर्वाधिक तर बिहारमध्ये सर्वात कमी मतदान नोंदविले गेले आहे. या मतदारसंघांमध्ये सकाळी ७ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत मतदान घेण्यात येत आहे. सायंकाळी सहा वाजेपर्यंतचे मतदान टक्केवारी आली आहे. देशात ५९.७१ टक्के मतदान झाले तर महाराष्ट्रात पाच लोकसभा मतदारसंघात ५४. ८५% मतदान झाले.




सर्वाधिक मतदान पश्रि्चम बंगालमध्ये झाले असून ७७.५७% मतदान झाले आहे. दुसरा क्रमांक त्रिपुरा राज्याचा असून ७६.१०% मतदान झाले आहे. मेघालय ६९.९१%, मध्य प्रदेश ६३.२५%, तामिळनाडु ६२.०८%, यूपी ५७.५४%, बिहार ४६.३२%, उत्तराखंड ५३.५६%, जम्मू-कश्मीर ६५.०८%, राजस्थान ५०.२७%, छत्तीसगढ़ ६३.४१%, असम ७०.७७%, पाँडिचेरी ७२. ८४%, अरुणाचल ६४.०७%, नागालैंड ५६.१८%, मिजोरम ५३.९६%, सिक्किम ६८.०६%, मणिपुर ६८.६२%, अंदमान निकोबार ५६.८७%, लक्षद्वीप ५९.०२%, महाराष्ट्र ५४.८५% एवढे मतदान झाले आहे.

सर्वात कमी मतदान हे बिहारमध्ये झालेले आहे. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात जास्त मतदान झाले तर सत्ताधाऱ्यांविरोधात मत गेल्याचे जाणकार सांगतात. २०१४ पेक्षा २०१९ मध्ये जास्त मतदान झाले होते. परंतु भाजपाचे सरकार पुन्हा आले होते. तर २००९ पेक्षा २०१४ मध्ये जास्त मतदान झाले होते. तेव्हा सत्तांतर झाले होते. यामुळे हे कमी झालेले मतदान कोणाच्या फायद्याचे हे ४ जुलैलाच समजणार आहे.

पहिल्या टप्प्यातील एकूण ५ लोकसभा मतदारसंघनिहाय (पान २ वर)

# लोकसभेसाठी नाशिक मतदारसंघातून छगन भुजबळ यांची माघार



नाशिक : लोकसभा निवडणुकीचा आज पहिला टप्पा पार पडत असला तरी महायुतीकडून नाशिक लोकसभा मतदारसंघाचा तिढा सुटलेला नाही. नाशिकमध्ये अधिक प्रभाव असलेले राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते व मंत्री छगन भुजबळ पहिल्यापासून या जागेसाठी आग्रही होते. मात्र, त्यासोबतच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे देखील नाशिकची जागा लढवण्यासाठी इच्छुक होते. यावर गेले कित्येक दिवस तोडगा निघत नव्हता. अखेर आज पत्रकार परिषद घेत आपण नाशिकच्या उमेदवारीतून माघार घेत आहोत, असं छगन भुजबळ यांनी जाहीर केलं. महायुती वाढवण्यासाठी महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार करु, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.

मुंबई येथील राष्ट्रवादी प्रदेश कार्यालयात छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषद घेतली. यात ते म्हणाले की, देशात लोकसभेच्या निवडणुका सुरू आहेत. काही ठिकाणी महायुतीत जागा कुणाला मिळणार याबाबत चर्चा सुरू आहे. नाशिकच्या बाबत होळीच्या दिवशी आम्हाला अजित पवार यांचा निरोप आला होता. तिथे प्रफुल्ल पटेल, सुनिल तटकरे होते. आज आम्ही ६ वाजता दिल्लीवरून आलो आणि त्या ठिकाणी अमित शाह यांच्यासोबत आम्ही चर्चा केली तिथे जागा वाटप बाबत चर्चा झाली, असं ते मला म्हणाले. छगन भुजबळ यांना उभे करा असे थेट अमित शाह यांनी सांगितलं.

त्यावेळी एकनाथ शिंदे, अमित शाह यांना म्हणाले की तिथे हेमंत गोडसे आमचे उमेदवार आहेत. परंतु अमित शाह म्हणाले आम्ही त्यांना समजावू. आम्ही मतदारसंघात जाऊन आढावा घेतला. आम्हाला वातावरण चांगलं असल्याचं लक्षात आलं. अल्पसंख्याक ओबीसी आमच्या बाजूने असल्याचं लक्षात आलं. त्यानंतर बातमी फुटली आणि माझ्या उमेदवारी बाबत माध्यमातून बातमी बाहेर आली. हे सुरू झाल्यानंतर मी बातमी खरी आहे का हे चेक करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांना फोन केला ते म्हणाले अमित शाह यांनी तुम्हाला लढावं (पान २ वर)

# महाविकास आघाडीचे डॉ. काळगे यांचा उमेदवारी अर्ज दाखल



लातूर /प्रतिनिधी :- लातूर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आज लातूर शहरातून भव्यदीव्य लक्षवेधी अतीवीशाल ऐतिहासीक मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीने लातूर शहरात आजवरच्या सर्व मिरवणुकीचे रेकॉर्ड मोडल्याचे दिसून आले.

अनेक मान्यवरांचा मिरवणुकीत सहभाग लातूर शहरातून निघालेल्या या मिरवणुकीत महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्षाचे नेते, माजी मंत्री, आमदार अमित देशमुख, माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील, आमदार धिरज देशमुख, माजी आमदार दिनकर माने, माजी आमदार रोहीदास चव्हाण, आशाताई शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर या मिरवणुकीत सहभागी झाले.

गंजगोलाई येथील जगदंबा मातेची विधीवत पूजाअर्चा करून या मिरवणूकीला सुरूवात गंजगोलाई येथील जगदंबा मातेची विधीवत पूजाअर्चा करून या मिरवणूकीला सुरूवात झाली. या मिरवणूकीत लातूर लोकसभा मतदार संघातील लोहा, कंधार तालुक्यातील अतीदुर्गम भागापासून अहमदपूर, चाकूर, उदगीर, निलंगा, शिरूरअनंतपाळ, औसा, रेणापूर, देवणी, जळकोट या सर्वच तालुक्यातून डॉ.काळगे यांना पाठींबा देण्यासाठी या मिरवणूकीत सहभागी झाले होते. विविध जातीधर्माचे लोक पारंपरीक वेशात मिरवणुकीत सहभागी सामाजीक न्यायाची भुमिका घेऊन निवडणूक लढवत असलेले लातूर लोकसभा मतदार संघातील उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांनी पाठीबा देण्यासाठी विविध जातीधर्माचे लोक पारंपरीक वेशात या मिरवणुकीत सहभागी झाले होते. यामध्ये बंजारा समाजाच्या महीला यांचे पारंपरीक नृत्य, हालगी पथक, पोतराज संबळ, धनगर समाजाचे ढोलताशे वासुदेव, वारकरी यांनी लातूरकरांचे लक्ष वेधून घेतले.

विविधतेतून एकतेचे दर्शन घडविणारे चित्र डॉ. काळगे यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी निघालेल्या या मिरवणूकीत काँग्रेस, राट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शेतकरी कामगार पक्ष, कम्युनीष्ठ पक्ष, आम (पान २ वर)

# मोदी सरकारच्या कार्यकाळात देशात गरीब कल्याणाचे काम : अरविंद पाटील निलंगेकर

शिरुर अनंतपाळ/प्रतिनिधी : मागील दहा वर्षांच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात गरीबांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविण्यात आल्या. यातून गरिबी हटविण्यासाठी केंद्र सरकारची कटिबध्दता दिसून आल्याचे मत युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केले.



लातूर लोकसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टी, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवारगट), महाराष्ट्र नवनिर्माण सेना, रिपाई (आठवले), रासप, रयत क्रांतीसह महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ शिरुर अनंतपाळ तालुक्यात विविध ठिकाणी आयोजित मेळाव्यात मार्गदर्शन करताना निलंगेकर बोलत होते.

यावेळी उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, पंडितराव धुमाळ, ॲड. संभाजीराव पाटील, शिवसेना शिंदे गट जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने, रिपाइं आठवले गट जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे, रासप जिल्हाध्यक्ष नागनाथ बोडके, मनसे जिल्हाध्यक्ष डॉ. नरसिंह भिकाने, माजी जि. प. अध्यक्ष राहुल केंद्रे, राष्ट्रवादी काँग्रेसचे व्यंकट बेद्रे, भारत चामे, भाजपा तालुकाध्यक्ष मंगेश पाटील कुमोद लोभे, विठ्ठल पाटील, विकास शिंदे, शिवाजी पेठे, मधुकर कांबळे, शिवाजी हजारे शेषराव ममाळे, दगडू सोळुंके आदींसह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना अरविंद पाटील म्हणाले की, खा. सुधाकर श्रृंगारे यांनी गेल्या पाच वर्षात या मतदारसंघातील कोणाचेही मन दुखावले नाही. त्यामुळे या मतदारसंघातून ७५ हजारांचे मताधिक्य मिळाले पाहिजे. सर्व पक्षाचा समन्वय प्रत्येक घरापर्यंत दिसला पाहिजे. पंतप्रधान मोदी संसदेत जाताना नतमस्तक झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी गरीब कल्याणाच्या ९६ योजना राबवल्या. आपला देश सर्वच बाबतीत सुरक्षित आहे. दिशा व विश्र्वास देणारा नेता मोदीजी आहेत. आज विकसित भारतासाठी मोदीजी प्रयत्न करीत आहेत. आ. संभाजी पाटील पालकमंत्री असताना लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्याला समान निधी दिला.भाजपने जिल्हा परिषदेच्या माध्यमातून महिला, समाजकल्याण, आरोग्य, शिक्षण या क्षेत्रात सामान्य माणसाला केंद्रबिंदू (पान २ वर)




हिंदुरुदय सम्राट माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या शिकवणी नुसार नुसार ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण ह्या उद्देशानुसार लातूर शहर प्रमुख शिवसेना –ॲड. परवेज भाई पठाण यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा संपर्क कार्यालय येथे केक कापून वाढदिवस साजरा करण्यात व तसेच आला शासकीय रुग्णालय लातूर येथे रुग्णांच्या नातेवाईकांना अन्न वाटप करण्यात आले त्यावेळी समर्पण फाउंडेशनचचे डॉक्टर शांतीलाल शर्मा राजेश मित्तल सहकार्याने सहकार्य यावेळेस शिवसेना संपर्क प्रमुख बळवंत भाऊ जाधव साहेब शेतकरी संघटना महाराष्ट्र उपाध्यक्ष कराड साहेब व महिला सो कल्पनाताई बावगे सोमानी साहेब विजय भाऊ कांबळे साहेब बालाजी गोडसे पाटील सदाशिव गव्हाणे नितीन बापू महाजन अर्जुन भाऊ जाधव साहेब कृष्णा सरवदे गणेश पवार व महिला भगिनी बबीता ताई गायकवाड नगिमेताई शिव चैतन्य पाटील ताई शोभाताई कदम बालिका ताई शिरसागर कुशाल ताई शिंदे बालाजी सुरवसे साहेब साहेबराव गायकवाडजी संदीप मामा जाधव श्याम साबळे. पुरुषोत्तम पाटील साहेब पुण्यनगरी पत्रकार पठाण साहेब व शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.



# निष्कलंक व निर्मळ मनाच्या खा. सुधाकर शृंगारेला मोठ्या मताधिक्याने विजयी करा - माजी आमदार बब्रुवान खंदाडे

अहमदपूर दि.१९(प्रतिनिधी) निष्कलंक व निर्मळ मनाच्या खा. सुधाकर शृंगारेला मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे प्रतिपादन माजी आमदार बब्रुवान खंदाडे यांनी केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, निष्कलंक व निष्पाप असलेल्या खा. सुधाकरराव श्रृगांरे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे अहवान अहमदपूर विधानसभा मतदारसंघातील जनतेला माजी आमदार बब्रुवान खंदाडे यांनी केले आहे.

खा. सुधाकरराव श्रृगांरे यानां मत म्हणजे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदींना मत गेल्या पाच वर्षांत खा. सुधाकरराव श्रृगांरे यांनी कोट्यवधी रुपयांचा विकास निधी मतदारसंघात आणुन सर्वधर्म समभाव जोपासत सर्व धर्माचे,महापुरुषांचे उत्सव स्वखर्चाने करून सर्वधर्म समभाव जोपासण्याचे महाण कार्य सुधाकरराव श्रृगांरे यांनी केले असल्याने मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे अहवान माजी आमदार बब्रुवान खंदाडे यांनी केले आहे.



भारतीय जनता पार्टी व महायुतीचे उमेदवार खा. सुधाकरराव श्रृगांरे यांना मत म्हणजे विकासाला मत, पंतप्रधान नरेंद्र भाई मोदीना मत.

गेल्या दहा वर्षात देशाचा ज्या गतीने विकास झालेला आहे या विकासामुळे देशाची प्रतिमा उंचावली असुन आज देश एक समृद्ध राष्ट्र निर्भीड राष्ट्र व आर्थिक विकासाकडे झेपावणारा राष्ट्र अशी प्रतिमा जगात निर्माण झाली आहे हा लौकिक भारताने गेल्या दहा वर्षात कमावलेला असून देशाचे लाडके पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली देशात सर्वच क्षेत्रात झालेला विकास होय .पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कोरोणा काळात मोफत लस पुरवठा करुन अन्नधान्य पुरवठा करुन जनतेला दिलासा दिला. राष्ट्रीय महामार्ग, विमानसेवा, वंदेभारतरेल्वे यांचे जाळे निर्माण केले. शास्त्रज्ञांचे मनोबल वाढवून चंद्रयान यशस्वी केले.स्वताच्या आईचे अंत्यसंस्कार करुन दसऱ्या तासांत देशाच्या सेवेसाठी कार्यरत राहणारे,गेल्या पंचवीस वर्षांत एक दिवसाची विश्रांती न घेता देश सेवा करण्यासाठी कार्यमग्न राहणारे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी निर्मळ मनाच्या खा. सुधाकरराव श्रृगांरे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे अहवान माजी आमदार बब्रुवान खंदाडे यांनी केले आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समृद्धी महामार्ग, जलयुक्त शिवार,व्ही. एस.टी.एफ.(ग्रामोथान)योजना, अशा अनेक योजना प्रभाविपणे राबविल्या .जिवाची परवा न करता कोविडच्या महामारी काळात जनतेच्या सुरक्षेसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मेहणत घेतली. खा. सुधाकरराव श्रृगांरे यांनी कोविडच्या महामारी काळात मतदारसंघात अन्नधान्याचे मोफत किट वाटप करुन जनतेला दिलासा देण्याचे काम केले होते. स्वच्छ प्रतिमा, निष्कलंक असलेल्या खा सुधाकरराव श्रृगांरे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे अहवान माजी आमदार बब्रुवान खंदाडे यांनी केले आहे .

# लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा हक्क बजावावा-कलाध्यापक महादेव खळुरे

अहमदपूर दि.१९(कारामुंगीकर) लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा हक्क बजावावा असे प्रतिपादन कलाध्यापक महादेव खळुरे यांनी केले.




याबाबत अधिक माहिती अशी की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी लातूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने अहमदपूर चाकूर विधासभा मतदार संघात स्वीप पथकाद्वारे मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विविध उपक्रमातून जनजागृती होत असून दि.१९ रोजी सकाळी मौजे येस्तार येथिल मतदार बंधू-भगिणींना मतदानाचे महत्त्व पटवून देवून,लोकशाहीतील महा उत्सवात सहभाग नोंदवावेत. आपण शासनाच्या सर्व सोई सुविधा हक्काने उपभोगत आहोत.संविधानाने आपणास दिलेला मतदानाचा हक्क येणाऱ्या ७ मे रोजी आपले कर्तव्य समजून पार पाडून देशाचे आदर्श भारतीय नागरीक होण्याचे कर्तव्य पार पाडून देशातील आदर्श नागरीक होण्यासाठी महाउत्सवात सहभाग नोंदवावेत.असे स्वीप कलापथक प्रमुख महादेव खळुरे यांनी शासनाच्या वतीने आवाहन केले.

या अभियानांसाठी जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकुर मॅडम सहाय्यक निवडणूक अधिकारी मंजुषा लटपटे,अहमदपूर चे तहसीलदार शिवाजी पालेपाड,चाकूर चे तहसीलदार नरसिंग जाधव, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघात जनजागृती कार्यक्रम करण्यात येत आहे.

सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वीपचे पथक प्रमुख राज्यपुरस्कार प्राप्त कला शिक्षक महादेव खळुरे, शिवकुमार गुळवे,मोहन तेलंगे, श्रीमती अर्चना माने,आदिनी परिश्रम घेतले.येस्तार येथिल तलाठी शिवम पुलकुटवार, ग्रामसेवक सचिन तावरे,प्रतिष्ठित नागरीक बंडू ढाकणे,संजू ठाकणे,मुंजाजी राजपंगे साने गुरूजी विद्यालय येस्तार चे मुख्याध्यापक सुनील जाधव पर्यवेक्षक डी.जे. तुमराम विवेकानंद मठपती सौ.वनिता वाडीकर, श्रीमती आर्चना पाष्टे आदि मतदारांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोहन तेलंगे तर आभार शिवकुमार गुळवे यांनी मानले

# जितेंद्र उर्फ पिंनू सेठ सोनी यांचे दुःखद निधन



अहमदपूर दि.१९ (कारामुंगीकर) जितेंद्र उर्फ पिंनू सेठ सोनी यांचे दुःखद निधन झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, येथील सोन्या-चांदीचे व्यापारी जितेंद्र उर्फ पिंनू सेठ बजरंगलाल सोनी यांचे दिनांक १८ रोज गुरुवारी दुपारी एक वाजता अलपशा आजाराने मुंबई येथे खाजगी रुग्णालयामध्ये उपचार प्रसंगी वयाच्या ४८ व्या वर्षी दुःखद निधन झाले .

त्यांचा पार्थिवावर आज दि.१९.०४.२४ रोजी शुक्रवारी सकाळी ९.३० वाजता मारवाडी स्मशानभूमीमध्ये अत्यंत शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत.

त्यांच्या पश्चात पत्नी, आई, वडील, बहिण ,एक मुलगा, एक मुलगी असा मोठा परिवार असून सोनी कलर चे मालक बजरंगलाल सोनी यांचे ज्येष्ठ चिरंजीव आणि आडत व्यापारी सचिन सोनी यांचे ते बंधू होते.

जितेंद्र उर्फ पिंनू सेठ सोनी यांच्या दुःखद निधनाबद्दल सर्व स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## कलावतीबाई सरकाळे यांचे दुःखद निधन

---



अहमदपूर दि.१९ (कारामुंगीकर) कलावतीबाई सरकाळे यांचे दुःखद निधन झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, येथील माळी समाजातील समाजातील जेष्ठ महिला कलावती बाई माधवराव सरकाळे यांचे दि. १७ रोज बुधवार दुपारी ३.०० च्या दरम्यान वयाच्या ९८ व्या वर्षी राहत्या घरी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले .

त्यांचा वर दि १८ एप्रिल २४ रोजी स.१०.०० वा सार्वजनिक स्मशानभूमीमध्ये शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले.

यांच्या पश्चात मुलगा, मुलगी एक, नातवंडे, परतवंडे असा परिवार असून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, इस्लामपूर तालुका सहशिक्षक बालाजी सरकाळे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## कागदपत्रे हरवली आहेत

---

**माने भरत संजय** या नावाचे इ.१० वी, १२ वी, बी. एस.सी. ग्रज्युएशन, एम. एस. सी. पोस्ट ग्रज्युएशन, सनद, गुणपत्रके, टी. सी., कम्प्युटर टायपिंग ३०, ४० शब्द पर मिनिट, एम.एस. सी.आय.टी. प्रमाणपत्र, बी.एस. सी. डिग्री प्रमाणपत्र व इतर शैक्षणिक कागदपत्रे दि. १९ एप्रिल २०२४ रोजी पहाटे ३.०० च्या सुमारास औरंगाबाद एक्सप्रेस रेल्वेत हैद्राबाद ते लातुर रोड रेल्वे प्रवासादरम्यान हरवले आहेत. सदरील शैक्षणिक कागदपत्राचे बॅग हरवल्याचे बिदर रेल्वे स्टेशनला समजले.


सदरील कागदपत्राची बॅग कोणास सापडल्यास खालील पत्ता किंवा मोबाईल नंबरवर संपर्क करावा.

**माने भरत संजय**
मु. पो. तीर्थ, ता. अहमदपूर
जि. लातूर
संपर्क मो. नं. ८०१०९५३९७०

## अर्ज भरताना

---

अर्ज भरताना
काय तुझा तोरा
काय तुझा रुबाब मोठा
जनसमुदाय बघून
लोक घालतात तोंडात बोट..
आज तुझ्या सोबत आहेत
उद्या दुसर्या सोबत जातील
बुद्धी गहाण नको ठेऊ
चालतोय का तू जनते साठी
तुला वाटत असेल
मीच येणार निवडून
पण आता ध्यानात ठेव
जनता कधी देईल तुला पाडून
आज रस्ते जाम करता
जनशक्ती दाखवून
पण उद्या निकाल आला की
बसशील डोळे चाचपून.
जनता आता वेडी नाही
कळते आहे सार.
तुमची शक्ति निष्फळ सारी
युवा मतदारांना मुळे....



**वाघमारे उषा**
ग्रामीण लेखिका, लातूर.
९६३७२०९४२२

# सन्मान आदर्श मातेचा..!

अहमदपूर दि.१९ (कारामुंगीकर) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने २०२२ मध्ये घेतलेल्या राज्य सेवा परीक्षेत उत्तीर्ण होऊन उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) पदी निवड झालेले अहमदपूरचे भूमिपुत्र धनराज कांबळे यांच्या मातोश्री मंगलताई मोहनराव कांबळे यांचा आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सत्कार करण्यात आला.



मंगलताईंचे माहेर उदगीर तालुक्यातील वाढवणा. त्यांचे वडील किशनराव भांगे हे जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक होते. चार बहिणी आणि एक भाऊ असं त्यांचं मोठं कुटुंब. १९८२ साली मंगलताई प्रथम श्रेणीत मॅट्रिक पास झाल्या. त्यानंतर त्यांनी अकोला येथे ए. एन. एम. परिचारिका ट्रेनिंग पूर्ण केले. १९८४ साली त्यांची अजनसोंडा ता. चाकूर येथे परिचारिका म्हणून निवड झाली. १९८६ साली तिथंच त्यांचा विवाह देवर्जन येथील सुशिक्षित बेरोजगार तरुण मोहन कांबळे यांच्याशी विवाह झाला. विवाहानंतर काही दिवसातच मोहनरावांना माकेगाव येथील सरस्वती विद्यालयात शिक्षक म्हणून नोकरी लागली.

मंगलताई व मोहनराव यांना दोन मुली व एक मुलगा झाला. मुलांच्या शिक्षणासाठी मंगल ताईंनी स्वेच्छा निवृत्ती घेतली. दरम्यान २०१८ साली मोहनरावांचे अकाली निधन झाले. या दुःखातून सावरत मंगल ताईंनी आपल्या लेकरांना हिंमतीने स्वतःच्या पायावर उभे रहायला शिकवले. मोहनराव आणि मंगल ताई हे दांपत्य सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर राहिलेले आहे. त्याचेच फळ म्हणून आज त्यांच्या शुभांगी व सरस्वती या दोन्ही मुली शिक्षिका असून मुलगा धनराज हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन डी.वाय.एस.पी. पदी त्याची निवड झाली आहे. आपल्या मुलांना चांगले संस्कार देऊन घडविणाऱ्या या आदर्श मातेचा सत्कार करण्याची संधी आज लाभली.

यावेळी महात्मा फुले महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सतीश ससाणे, दै. यशवंतचे उपसंपादक पत्रकार डॉ. बालाजी कारामुंगीकर उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता आणि सामाजिक बदल

समाजातील वंचित, उपेक्षित, दलित यांच्यासाठी शैक्षणिक आणि सामाजिक विकासबदलासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्रकारिता या लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा उपयोग करुन सामाजिक बदल घडविण्यासाठी जीवनभर अविरत कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे संपूर्ण मानव जातीला लाभलेले एक असे महापुरुष होते की, ज्यांनी माणसाला सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी पत्रकारितेच्या माध्यमातून नविन तत्त्वज्ञान समाजासमोर मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र जीवन म्हणजे मानव मुक्तीच्या ध्येयासाठी केलेली तपश्चर्या होती. पत्रकारितेच्या माध्यमातुन सामाजिक बदल घडवून आण्याची भाषा बहिष्कृत भारत, मूकनायक या वृत्तपत्राद्वारे नेहमीच होत होती आणि यामुळेच शासनकर्त्यांना मानवांना अधिकार दिलाच पाहिजे असा एक विचार यामुळे निर्माण झाला होता. भारत १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र झाला आणि आपण लोकशाही स्वीकारली आणि यामुळेच सामाजिक न्यायासाठी पोषक वातावरण निर्माण झाले. हे पोषक वातावरण निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य जर कोणी केले असेल तर बहिष्कृत भारत आणि मूकनायक या वृत्तपत्रांनी असे म्हणने वावगे ठरणार नाही. डॉ. आंबेडकरांची वृत्तपत्रे दलित, शोषित, पीड़ित समाजाकरिता उद्बोधक व प्रभावी साधने ठरली. आणि यामुळेच समाजात जाणीव जागृती होऊन सामाजिक बदल होण्यास पोषक वातावरण निर्माण झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरु केलेल्या वृत्तपत्रातून जुन्या, रूढी, परंपरावर मात करून नवीन विचार रुजविणे, आधुनिकतेची कास धरून बदल घडून यावा याकरिता त्यांचे विचार आजही समर्पक आणि दिशादर्शक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील वास्तव पत्रकारितेच्या माध्यमातून व्यक्त केलेले विचार वंचित, दलित, उपेक्षित जनमानसात सामाजिक बदल निर्माण करण्यासाठी सहाय्यक ठरले. डॉ. आंबेडकरांनी त्यावेळेची दलित समाजाची अवस्था पाहिली आणि स्वतः अनुभवली, त्यामुळे अशीच परिस्थिती कायमस्वरूपी राहिली तर या समाजाचा विकास होणार नाही. त्याकरिता वृत्तपत्रे ही सामाजिक बदलाची, परिवर्तनाची प्रभावी साधने आहेत. म्हणून डॉ. आंबेडकरांची वृत्तपत्रे दलित समाजात बदल होण्यास उपयुक्त व महत्त्वपूर्ण ठरली आहेत. या सामाजिक बदलासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महान मंत्र दिला. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, या मंत्रांना प्रबळ बनविण्यासाठी त्यांनी पत्रकारितेचा उपयोग केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे यशस्वी पत्रकार आणि तत्कालिन वास्तविक मांडणी करणारे प्रभावी संपादक होते. समाज परिवर्तनासाठी वृत्तपत्रासारखे दूसरे प्रभावी माध्यम नाही, समाजाची प्रगती करण्यासाठी पत्रकारिता हाच एकमेव लोकशाहीचा स्तंभ आहे असा त्यांचा विश्वास होता. चळवळीची वाढ करण्यासाठी, चळवळीला ताकत देण्यासाठी वृत्तपत्र अत्यंत महत्त्वाचे आहे असे ते मानत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित, शोषित, पीड़ित आणि दलित समाजात जागृती करण्यासाठी अनेक शोधनिबंध आणि पाच मासिके प्रकाशित आणि संपादित करुन समाजिक बदल घडवून आण्यासाठी त्यांचे प्रयत्न येण्याऱ्या काळात प्रेरणादायी आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून दलित चळवळ पुढे नेण्यात त्यांना वृत्तपत्रांची खूप मदत झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शोषित, वंचित, दलित पत्रकारितेचे प्रमुख आधारस्तंभ आहेत. ते दलितांतील पहिले संपादक, संस्थापक आणि प्रकाशक बनून समाजाचा चेहराच बदलुन टाकुन भारतीय समाज व्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणला. डॉ. बाबासाहेबांनी दलित समाजातुन पहिल्यांदा सन १९२० साली ङ्गमूकनायकफ, सन १९३० ङ्गजनताफ, सन १९२७ साली ङ्गबहिष्कृत भारतफ, सन १९२८ साली ङ्गसमताफ आणि स्वातंत्र्यानंतर सन १९५६ साली ङ्गप्रबुद्ध भारतफ या पाच मराठी नियतकालिकांचे यशस्वीरित्या संपादन करुन सामाजिक परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली. या नियतकालिकांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आर्थिक प्रश्नांवर आपले विचार मांडुन जनमानसात परिवर्तनाची बिजे रोवली.

दलितांवर, वंचितावर, अस्पृश्यांवर होणाऱ्या अत्याचारांवर प्रकाश टाकण्यासाठी ३१ जानेवारी १९२० रोजी बाबासाहेबांनी ङ्गमूकनायकफ नावाचे पहिले मराठी पाक्षिक सुरू केले. मूकनायक या मराठी पाक्षिकाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पांडुराम नंदराम भाटकर हे पहिले संपादक होते. या वृत्तपत्राच्या मुखपृष्ठावर संत तुकारामांचे वचन जाणीव पूर्वक छापण्यात आले होते. ते असे -

काय करु आता धरुनिया भीड ।
नि:शंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगी कोणी मुकियांचा जाणे ।
सार्थ का लागत नव्हे हित ।।

डॉ. बाबसाहेब आंबेडकरांच्या मूकनायक या वृत्तपत्रामागील भूमिका म्हणजे समाजातील अव्यक्त, बंदिस्त व भयान अन्यायाची वाचा फोडणे ही होती. ममूकनायकफ या वृत्तपत्राचा अर्थ पहावयाचा झाला तर मूक दलितांचा, वंचितांचा, उपेक्षितांचा तो आवाज होता. या वृत्तपत्राने दलितांमध्ये एक नवीन आशा, चैतन्य व उत्साह निर्माण करुन त्यांच्या हक्कांसाठी, समाज बदलासाठी प्रवृत्त केले आहे. काही अडचणीमुंळे ङ्गमूकनायकफ वृत्तपत्र बंद पडले परंतु पत्रकारितेची पेटवलेली मशाल ३ एप्रिल १९२४ रोजी ङ्गबहिष्कृत भारतफ या नावाने दुसरे मराठी पाक्षिक काढुन तेवत ठेवण्यात आली. बहिष्कृत भारत या पाक्षिकाचे संपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वत:च केले होते. या पाक्षिकाच्या माध्यमातून अस्पृश्य समाजाच्या समस्या व तक्रारी समोर आणण्याचे तसेच टीकाकारांना सडेतोड उत्तरे देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सत्य व स्फूर्ति निर्माण करणारे लेखन केले. संपादकीय मध्ये बाबासाहेबांनी समाजाला वास्तवाची जाण करुन देण्यासाठी म्हटले आहे - जर बाळ गंगाधर टिळक अस्पृश्यांमध्ये जन्माला आले असते तर त्यांनी ङ्गस्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहेफ असा नारा दिला नसता, तर ङ्गअस्पृश्यता निर्मूलन हा माझा जन्मसिद्ध हक्क आहेफ असे म्हटले असते. निर्भिडपणे समाजापुढे वास्तव मांडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लेखनीच्या माध्यमातून समाज बदलासाठी पोषक वातावरण निर्माण केले. परंतु आर्थिक अडचणीमुळे सन १९२९ मध्ये बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र नाविलाजास्तव बंद करावे लागले.

पत्रकारिताच समाज परिवर्तनाचे महत्वपूर्ण माध्यम बनू शकते. पत्रकारितेच्या सहाय्यानेच आपण समाजातील उपेक्षित, वंचित, दलित समाजाला न्याय मिळवून देवू शकतो. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी ङ्गसमताफ (हिंदी: समानता) हे पत्र सुरू केले होते. परंतु ङ्गसमताफ हे पत्र बंद पडल्यानंतर ङ्गजनताफ या नावाने पुन्हा प्रकाशित करुन पत्रकारितेचा घेतलेला वसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालुच ठेवला. आणि यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ङ्गआम्ही शासनकर्ती जमात बनणारफ असे लेखातुन समाजाला सांगुन समाज बदलाचे विचार समाजासमोर ठेवले. ङ्गजनताफ या पत्राव्दारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वंचित, दलित, उपेक्षति, शोषितांच्या समस्या मांडण्याचे खुप मोठे मौलिक कार्य केले आहे. स्वातंत्र्यानंतर म्हणजेच १९५६ पर्यंत एकूण जवळपास २६ वर्षे हे साप्ताहिक चालू होते. भारताच्या स्वातंत्र्याच्या जडण-घडणित जनता हे साप्ताहिक महत्वाची भूमिका निभावले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ४ फेब्रुवारी १९५६ रोजी पाचव्यांदा जनता या साप्ताहिकाचे नाव बदलुन प्रबुद्ध भारत या नावाने पाक्षिक सुरू केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर प्रबुद्ध भारत हे पाक्षिक बंद झाले. बाबासाहेबांचे नातू प्रकाश आंबेडकर यांनी प्रबुद्ध भारत ची नवीन सुरुवात १० मे २०१७ रोजी करुन त्यांचे विचार समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य पत्रकारितेच्या माध्यमातून करत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या वृत्तपत्रांच्या माध्यमातून आपल्या विचारांनी दलित, वंचित, उपेक्षित, शोषित, स्पृश्य आणि अस्पृश्यांचे प्रबोधन तर केलेच मात्र त्यामुळे दलितांच्या विचारात आणि जीवनात अमुलाग्र बदल झाला आणि हा बदलच समाज बदलास कारणीभूत ठरला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्राचे नाव ठेवत असताना विचारपूर्वकच ठेवले आहे. मूकनायक ज्यावेळी समाज मूक बनून सर्व अन्याय सहन करीत होता त्यावेळी त्यांना वाचा फोडण्यासाठी जाणीवपूर्वक वृत्तपत्रास मूकनायक हे नाव ठेवले. यानंतर बाबासाहेबांनी बहिष्कृत भारत हे नाव वृत्तापत्रास ठेवले. समाजिक बदल घडवुन आण्यासाठी वास्तवाची जाण करुन द्यावी लागते यासाठी बाबासाहेबांनी हे नाव ठेवले असावे. यानंतर ङ्गसमताफ हे वृत्तपत्र सुरु केले. मूके असल्याची, बहिष्कृत असल्याचे जाणीव जेंव्हा होईल तेंव्हाच देशात समता स्थापित होईल, यावर डॉ. बाबासाहेबांचा विश्वास होता. यानंतर ङ्गजनताफ हे नाव ठेवले याचे रुपांतर ङ्गप्रबुद्ध भारतफ यामध्ये करण्यात आले. म्हणजेच मुक्यांना बहिष्कृत असल्याचे जाणीव करुन दिली. आणि जेंव्हा ही जाणीव होईल तेंव्हाच समता स्थापित होवुन सामाजिक बदल होईल, जनता सर्वस्व आहे आणि त्यांच्या विकासामुळे, सामाजिक बदलामुळेच प्रबुद्ध भारत बनु शकतो याची जाणीव समाजाला करुन देण्यासाठी असे नाव ठेवले असतील असे मला वाटते. त्यावेळची वृत्तपत्रे विशिष्ट जातींचीच हुजरेगिरी करणारी, दलित, वंचित, अस्पृश्यांवर अन्यायच करणारी होती. यामुळे या गोष्टिचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विचार करुनच पत्रकारितेचे शस्त्र अस्पृश्य समाजाचा विकासासाठी बाहेर काढले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून अनेक चळवळी चालविल्या. मानगाव येथे कोल्हापूरजवळ परिषद घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांचे प्रश्न मांडले. राजर्षि शाहू महाराजांनी या परिषदेत डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाचे स्वागत करुन त्यांच्याकडून या समस्यांना गती मिळेल असे अभिवचन दिले होते. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे चवदार तळ्याच्या सत्याग्रह केला आणि त्याची बातमी त्यांच्या बहिष्कृत भारत या वृत्तपत्रात छापुन आली. काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह करुन पत्रकारितेच्या माध्यमातुन या चळवळीला संपूर्ण भारतभर पसरविण्याचे कार्य यामुळे झाले. डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती दहन करून जातीव्यवस्थेला विरोध करुन पत्रकारितेच्या माध्यमातून संपूर्ण देशात चळवळ निर्माण केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्याय चळवळीस येवला येथे आपण हिंदू जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. ही घोषणा वाऱ्यासारखी वृत्तपत्राच्या माध्यमातुन भारतभर पसरली अश्या अनेक चळवळींना पत्रकारितेची जोड देत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाज बदलासाठी पत्रकारितेचा उपयोग करुन घेतला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक परिवर्तनवादी विचार समोर ठेवून पत्रकारितेच्या माध्यमातून तत्कालिन समाजव्यवस्था, समाजातील निरुपयोगी, कालबाह्य तत्वे, स्वार्थी व शोषण करणारे राजकारण याचे विवेचन वृत्तपत्रातून मांडुन सामाजिक परिवर्तनासाठी पत्रकारितेचा उपयोग केला. समाजशास्त्रीय दृष्टिकोण, चोख व संदर्भानुसार विवेचन, आत्मविश्लेषणात्मकता, पोटभिरु वृत्तीवर टिका, वास्तववादी परखडपणा इत्यादी बाबासाहेबांच्या पत्रकारितेची वैशिष्टये समाज बदलासाठी पोषक ठरली. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या सबंध आयुष्यामध्ये पत्रकारितेला व्यावसायिक रूप येवू दिले नाही. पत्रकारिता ही आत्मोन्नती आणि व्यक्ति विकासावर आधारित असली पाहिजे यासाठी त्यांनी कार्य केले.

उपेक्षित, वंचित, शोषित अस्पृश्यांचा विकास हे उद्दिष्ट त्यांच्या पत्रकारितेचे होतेच परंतु समाजाची उन्नती, मानवी हक्कासाठी लढा, स्त्रीयांना सामाजिक स्थान, समता, बंधूता आणि न्याय या तत्वावर आधारित डॉ. बाबासाहेबांनी पत्रकारिता केली आहे. यासाठीच आपले संपूर्ण आयुष्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खर्ची केले.

**डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर**
यशवंत क. महाविद्यालय, अहमदपूर
मो. नं. ९८२३११२९०७
Email-karamungi-karbalajigmail.com

# यशवंत धाराशिव जिल्हा

शुक्रवार दि. १९ एप्रिल २०२४




कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com

## दरमहा वेतन व भविष्य निर्वाह निधीपासून आश्रम शाळेतील सर्व कर्मचारी वंचित

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील आश्रम शाळेत कर्तव्य बजावणारे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी नियमित वेतनापासून वंचित आहेत. तसेच गेल्या वर्षभरापासून ४० कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी प्रस्ताव मंजूर असूनही रक्कम मिळालेले नाही. त्यामुळे हा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा अशी मागणी आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्यावतीने एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, आश्रम शाळेमध्ये काम करणारे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हे वाडी, वस्ती, तांडा डोंगर आणि दुर्गम भागात शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचवण्याचे काम करत आहेत, या शिक्षकांना दरमहा एक तारखेला वेतन मिळावे या संदर्भात समाज कल्याण विभागाकडे यापूर्वी चर्चा झालेली आहे. मात्र प्रत्यक्षात दरमहा एक तारखेला वेतन देण्याची अंमलबजावणी झालेली नाही. आश्रम शाळा कार्यरत ४० शिक्षक व कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे प्रस्ताव समाज कल्याण विभागाच्या कार्यालयात प्रलंबित आहेत. अनेक कर्मचारी सेवा निवृत्त झालेले आहेत. मात्र त्यांना भविष्य निर्वाह निधीची रक्कम मिळत नाही. मुला मुलींचे लग्न घर बांधणी, आरोग्य, घर दुरुस्ती यासाठी या रकमेची कर्मचाऱ्यांना अत्यंत आवश्यकता आहे. त्यांच्या कष्टाची हक्काचे पैसे मिळत नाहीत ही खंत त्यांनी मांडली आहे.

# अर्चनाताई पाटील यांच्या शक्ती प्रदर्शनास प्रचंड प्रतिसाद





## महायुतीचे नेते, पदाधिकारी व जनसमुदायामध्ये उत्साह संचारला

## संपूर्ण शहरात राष्ट्रवादीच्या घड्याळाची लहर

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – उस्मानाबाद लोकसभा मतदार संघातील महायुतीच्या अधिकृत उमेदवार अर्चना राणाजगजितसिंह पाटील यांनी शुक्रवारी जोरदार शक्तिप्रदर्शन करत रॅलीद्वारे उमेदवारी अर्ज दाखल केला. नरेंद्र मोदी यांच्या नावाचा जयघोष, हातात पोस्टर, झेंडे घेतलेला प्रचंड मोठा जनसमुदाय आणि महायुतीच्या घटक पक्षातील सर्वच प्रमुख नेते आणि पदाधिकार्यांच्या उपस्थितीमुळे कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह संचारलेला होता. महायुतीच्या एकोप्याची वज्रमूठ प्रचंड शक्ती प्रदर्शनाच्या माध्यमातून धाराशिवकरांनी अनुभवली.


लोकसभेसाठी उमेदवारी दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार, पालकमंत्री तानाजी सावंत, राज्यमंत्री संजय बनसोडे, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार चंद्रशेखर बावनकुळे, माजी मंत्री बसवराज पाटील, आमदार राणाजगजितसिंह पाटील, आ अभिमन्यू आमदार राजाभाऊ राऊत, आ ज्ञानराज चौगुले, आ सतीश चव्हाण, आ विक्रम काळे, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर रिपाइंचे अध्यक्ष राजाभाऊ ओव्हाळ आदी उपस्थित होते.

दरम्यान, शहरातील जिजाऊ चौक येथून महायुतीतील राष्ट्रवादी, भाजपा, शिवसेना शिंदे गट, रिपाइं आठवले गट, मनसे आदी पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्त्यांच्या रॅलीस प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर उमेदवार अर्चना पाटील या ग्रामदैवत हजरत ख्वॉजा शमशोद्दीन गाजी यांच्या दर्गाह, धारासूर मर्दिनी मंदिर व त्यानंतर काळा मारूती मंदिरात दर्शन घेवून रॅलीत सहभागी झाल्या. ही रॅली आर्य समाज चौक, संत गाडगेबाबा चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे आल्यानंतर उमेदवार अर्चना पाटील यांनी महामानव डॉ. आंबेडकर यांना अभिवादन केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून ही रॅली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आली. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर रॅलीचे रूपांतर जाहीर सभेत झाले. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांचे सुपूत्र सुनील चव्हाण, माजी नगराध्यक्ष संपत डोके, बिभीषण काळे यांनी भाजपात प्रवेश केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तर अमित शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी माजी मंत्री बसवराज पाटील, आ ज्ञानराज चौगुले, राज्यमंत्री संजय बनसोडे, आ विक्रम काळे, आ राजाभाऊ राऊत, आ सतीश चव्हाण, आ अभिमन्यू पवार, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## डी.एस. ग्रुपच्यावतीने डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – विश्वभूषण, बोधीसत्व, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त डी.एस. ग्रुपच्यावतीने भव्य मिरवणुकीचे आयोजन दि.२० एप्रिल रोजी करण्यात आले आहे. ही मिरवणुक सायंकाळी ५ वाजता क्रांती चौक भिम नगर येथून निघणार आहे. या मिरवणुकीमध्ये कर्नाटक व आंध्र प्रदेशातील पारंपरिक वाद्य, हलगी, संबळ तर महाराष्ट्रातील पुणे, शंकरगड, बारामती व कोल्हापूर येथील वाद्यवृंद सहभागी होणार आहेत. त्यामुळे या मिरवणुकीमध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन डी.एस. ग्रुपचे मार्गदर्शक धनंजय (नाना) शिंगाडे व विश्वभूषण बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समारोह समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

धाराशिव शहरात मागील २६ वर्षापासून डी.एस. ग्रुपच्यावतीने दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरी केली जाते. यावर्षी समितीच्यावतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात येणार आहे. तर सायंकाळी ५ वाजता धाराशिव शहरातील भिम नगरमधील क्रांती चौकातून मिरवणूकीस प्रारंभ होणार आहे. या मिरवणूकीचे उद्धाटन शब्बीर अन्सारी, कल्याण दळे, विश्वास शिंदे, लक्ष्मणराव वडले, संजय ढवळे, भाऊसाहेब उंबरे, पंकज काटे, संपतराव डोके, मसुद शेख, पांडूरंग कुंभार, सुधीर पाटील, अमित शिंदे, आशिष मोदानी, गणेश खोचरे, आबासाहेब खोत, खलिल शेख, राजाभाऊ बागल, ॲड. रामभाऊ गरड, ॲड. प्रसाद जोशी, ॲड. प्रशांत कस्तुरे, ॲड. अजय देशपांडे, वाजीद पठाण, विजय मुद्दे, प्रकाश जगताप, मुनीर कुरेशी, उमेश राजे, अग्निवेश शिंदे, पांडूआण्णा भोसले, मुकूंद घुले, दत्ता बंडगर, दत्ता गोरे, भालचंद्र हुच्चे, बालाजी बोंदर, गजानन गवळी, ॲड. जयंत जगदाळे, संदिप जाधव, दिपक जाधव, तानाजी माळी (ढोकी), राजाभाऊ ओव्हाळ, सिद्धार्थ बनसोडे, पृथ्वीराज चिलवंत, पुष्पकांत माळाळे, डी. के. कांबळे, संग्राम बनसोडे, संजय वाघमारे, आयाज (बबलु) शेख, मेसा जानराव, मुकूंद घुले, संदिप बनसोडे, अरुण बनसोडे, नवज्योत शिंगाडे, राजाभाऊ पवार, लक्ष्मण माने, मिलिंद चांडगे, सुभाष पवार, नंदकुमार शेटे, जयंतराजे भोसले, अनिल हजारे, अजहर मौलाना, एलियास मुजावर, सतपाल बनसोडे, अभिजित गिरी, पांडू आण्णा भोसले, सुर्यकांत आनंदे, उस्मान कुरेशी, मुनीर कुरेशी यांच्या उपस्थितीत होणार आहे.



तसेच रात्री १२ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे आतषबाजीने मिरवणूकीचा समारोप होणार आहे. त्यामुळे या भव्य मिरवणूकीस जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन डी.एस. ग्रुपचे मार्गदर्शक धनंजय शिंगाडे व अध्यक्ष परवेज काझी, कार्याध्यक्ष सतीश कदम, उपाध्यक्ष हरिश्चंद्र शिंदे, सतीश ओहाळ, सचिव कृष्णा भोसले, सहसचिव रवी कोरे, कोषाध्यक्ष विशाल शिंगाडे, सल्लागार राजाभाऊ बागल, भाऊसाहेब उंबरे, नंदकुमार शेटे, सुभाष पवार, मिरवणूक प्रमुख रावसाहेब शिंगाडे, जैनुद्दीन मुजावर, सुरेश गवळी, सांस्कृतिक विभागप्रमुख अभिजीत गिरी,इलियाज मुजावर, योगेश वाघमारे, सागर चव्हाण, बापू साबळे, विजय उंबरे, संरक्षण समिती प्रमुख प्रसेनजित शिंगाडे, महेश शिंगाडे, समीर शेख, प्रसिद्धी प्रमुख यशवंत शिंगाडे, धम्मपाल कांबळे, सारीपुत शिंगाडे, सत्यजित माने, अजय शिंगाडे यांनी केले आहे.

## युवास्पंदन सामाजिक संस्थेच्या रक्तदान शिबिरात ११२ दात्यांनी केले दान

तुळजापूर दि.१९ (प्रतिनिधी) – येथील युवास्पंदन सामाजिक संस्थेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरामध्ये ११२ रक्तदात्यांनी दान करून या शिबिरास प्रतिसाद दिला.

तुळजापूर येथील नगर परिषद प्राथमिक शाळेचे माजी मुख्याध्यापक कै. दिगंबरराव कावरे गुरुजी यांच्या २० व्या पुण्यतिथीनिमित्त हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी महंत इच्छागिरी महाराज, सोलापूर येथील यशोधरा रुग्णालयाचे डॉ. विजय शिवपुजे, डॉ.कार्तिक यादव, डॉ. किरण पवार, डॉ. दिग्विजय कुतवळ, प्रा. सतीश बिडवे, प्राचार्य मीना इटीवार, मुख्याध्यापक गणेश रोचकरी आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात महेंद्र कावरे यांनी आजपर्यंत ऐच्छिक रक्तदात्याच्या माध्यमातून




गरजवंत रुग्णांची सेवा करण्याची संधी संस्थेस प्राप्त होत आहे. त्यामुळे तुळजापूर शहरात रक्तपेढीचे उपकेंद्र सुरू व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रशांत भागवत यांनी तर आभार निरंजन डाके यांनी मानले.

या शिबिरास पत्रकार प्रशांत कावरे, प्रदीप अमृतराव, सचिन ताकमोगे, अनिल आगलावे, माजी नगराध्यक्ष सचिन देशमुख, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष सदानंद राव, नागेश नाईक, गोरख क्षीरसागर, प्रवीण कदम, गुलचंद व्यवहारे, सागर कदम यांनी सदिच्छा भेट देऊन शुभेच्छा दिल्या. तसेच या शिबिरात आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सुसेन सुरवसे यांचा सत्कार करण्यात आला. शिबिराच्या यशस्वितेसाठी बालाजी कामे, प्रा.समीर माने, रामेश्वर आपुणे, आशिष सुर्यवंशी, सार्थक बिडवे, प्रतीक बिडवे, सारंग कावरे, दामू घागरे, प्रमोद चौधरी, सागर सुर्यवंशी, वैशाली सुर्यवंशी, ज्योती बिडवे, स्वाती कावरे, ज्योती राऊत, यांनी परिश्रम घेतले.

## नरेंद्र मोदींमुळेच जगात देशाला मानाचे स्थान – उपमुख्यमंत्री पवार

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मागील १० वर्षांत केलेल्या गतीमान विकास कामांमुळे जगात देशाला मानाचे स्थान मिळाले आहे. त्यामुळे मोदी यांना तिसर्यांदा पंतप्रधान करण्यासाठी अबकी बार ४०० पारमध्ये चारशेवी जागा आपल्याला निवडून द्यावयाची आहे. राष्ट्रवादी, शिवसेना किंवा भाजपा ही एकच असताना कार्यकर्त्यांना कसलाही दुजाभाव मनात न ठेवता महायुतीच्या अर्चना पाटील यांच्या विजयासाठी कामाला लागावे, असे आवाहन राष्ट्रवादीचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

महायुतीच्या अधिकृत उमेदवार अर्चना पाटील शक्ती प्रदर्शनासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रचंड विराट जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत, राज्यमंत्री संजय बनसोडे, माजी मंत्री बसवराज पाटील, आमदार राणाजगजितसिंह पाटील, आमदार सतीश चव्हाण, पाशा पटेल, आमदार विक्रम काळे, आमदार अभिमन्यू पवार, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुरज साळुंखे, अनिल खोचरे रिपाइंचे राजाभाऊ ओव्हाळ, भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य नितीन काळे, ॲड. अनिल काळे, दत्ता कुलकर्णी, सुनील चव्हाण, राष्ट्रवादीचे सुरेश पाटील, नितीन बागल आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, केंद्र आणि राज्यातील महायुतीचे सरकार हे जनतेचे सरकार आहे. देशातील ३० कोटी गरिबांना हक्काची घरे देण्याचा संकल्प प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी केला आहे. राज्य सरकारही केंद्र सरकारच्या मदतीने गरीबांच्या कल्याणाच्या विविध योजना राबवित आहे. आगामी काळात ८.५९ लाख सोलार पंप राज्य सरकार शेतकर्यांना देणार आहे. एक रूपयात पीक विम्यामुळे शेतकर्यांना मोठी मदत झाली आहे. धाराशिव–तुळजापूर–सोलापूर रेल्वेमार्ग पूर्ण होण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने मिळून आर्थिक तरतूद केली असल्याचे त्यांनी सांगितले. तर कृष्णा मराठवाडा प्रकल्पामुळे जिल्ह्यातील एक लाख एकर जमीन ओलिताखाली येणार आहे. तसेच जपानी कंपन्यांचे



प्रकल्प, शाश्वत पाणी आणि उद्योग उभारून बेरोजगारांच्या हाताला मोठ्या प्रमाणात काम उपलब्ध होणार आहे. त्यामुळे जनतेच्या हिताचा विचार करणार्या मोंदीना तिसर्यांदा प्रधानमंत्री करण्यासाठी अर्चना पाटील यांच्या पाठीशी जनतेने खंबीरपणे उभे रहावे, असे आवाहन पवार यांनी केले.

यावेळी माजी मंत्री बसवराज पाटील, आमदार अभिमन्यू पवार, पाशा पटेल, आमदार ज्ञानराज चौगुले यांनी उमरगा–लोहारा व औसा विधानसभा मतदारसंघातून, तसेच बार्शीचे आमदार राजाभाऊ राऊत यांनी बार्शी मतदारसंघातून महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांना मोठे मताधिक्य मिळवून देण्याची ग्वाही दिली. तर आमदार राणाजगजितसिंह पाटील म्हणाले की, खासदाराचे काम केंद्रातून मोठा निधी आणणे, केंद्रातील योजनांचा लाभ सामान्य नागरिकांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आहे. परंतू विद्यमान खासदाराने हे काम केले का, याचा विचार मतदारांनी करणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त करून नरेंद्र मोदींचे विकासाचे पर्व यापुढेही चालू राहील. मतदारसंघात शाश्वत पाणी, उद्योग आणि पर्यटनाला चालना देवून सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटीबध्द असल्याचे सांगितले.

शिवसैनिकांनी राष्ट्रवादीपेक्षा जोमाने काम करावे पालकमंत्री प्रा. तानाजी सावंत महायुतीचा उमेदवार म्हणून धनंजय सावंत यांचा जानेवारी महिन्यापासूनच प्रचार सुरू होता. आजवर लोकसभेसाठी शिवसेनेने निवडणूक लढवली आहे. परंतु महायुतीत झालेल्या चर्चे अंती उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादीला देण्यात आला. त्यामुळे शिवसैनिकांमध्ये नाराजी पसरली. मात्र समोरच्या उमेदवाराचा या निवडणुकीत फडशा पाडायचा आणि नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करायचे आहे, यासाठी दुःख विसरून राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांपेक्षा जास्त जोमाने शिवसैनिकांनी उमेदवार अर्चना पाटील यांचा प्रचार करून मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्यासाठी परिश्रम घ्यावे, असे आवाहन पालकमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी केले.

### बार्शी व औसा मतदारसंघात लीड देण्यावरून स्पर्धा–आ.पवार

माझी आणि राजेंद्र राऊत यांची अर्चनाताईंना मताधिक्य देण्याची स्पर्धा असून आमचे सर्व नेते व कार्यकर्ते यासाठी रात्रंदिवस काम करत आहोत. आजची गर्दी पाहून आपला विजय आजच निश्चित झाला असल्याचे अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

# संपादकीय

## इराणचा हल्ला

लष्करी व्यूहरचनेच्या दृष्टीने भारतासाठी इराण आणि इस्त्रायल हे दोन्ही देश महत्त्वाचे आहेत. त्यामुळे नव्याने निर्माण झालेल्या तणावात समतोल कायम राखणे हे आव्हान ठरणार आहे. इराणने इस्रायलवर हल्ला केल्याने पश्चिम आशियासह जगभरातील अस्वस्थतेत भर पडली आहे. भारतीय शेअर बाजारावर त्याचे सावट पडले. खनिज तेलाचा पुरवठा आणि किंमती यावर परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे. इस्रायलने हल्ल्यास अद्याप तरी उत्तर दिले नसले तरी ती कृती होणार हे निश्चित. सीरियाची राजधानी दमास्कसमधील इराणच्या दूतावासावर एक एप्रिल रोजी हल्ला झाला. यात इराणचे जनरल महमद रेझा झहेदी यांच्यासह इराणच्या रिव्हॉल्युशनरी गार्डचे काही अधिकारी मारले गेले. इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्याचा बदला घेतला जाईल, असे इराणने लागलीच जाहीर केले होते. इराणने इस्रायलवर तीनशेहून अधिक ड्रोन, बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे याद्वारे हल्ला चढविला; मात्र, डेव्हिडस् स्लिंग', अमेरिकेच्या मदतीने तयार केलेली 'दी ॲरो' ही संरक्षक प्रणाली, अमेरिकेकडून तैनात करण्यात आलेली पॅट्रियट' यंत्रणा यामुळे इस्रायलचे नुकसान झाले नाही. अमेरिकेसह पाश्चात्य देश नेहमीप्रमाणे इस्रायलच्या बाजूने पुढे सरसावले आहेत. आयतुल्ला अली खामेनी हे इराणचे सर्वेसर्वा. त्यांच्या नेतृत्वाखाली इराणने आपल्या मर्यादा माहिती असूनही इस्रायलवर थेट हल्ल्याचा निर्णय घेतला हे लक्षणीय. हमास, येमेनमधील हुती बंडखोर आणि लेबाननमधील हिजबुल्ला या दहशतवादी गटांना इराणचा कायम पाठिंबा मिळत आला आहे. या गटांच्या मार्फत आतापर्यंत इराण छुपे युद्ध खेळत होता, आता तो उघडपणे मैदानात उतरला आहे.

**इराणवरील निर्बंध**

इराणचा आण्विक कार्यक्रम, हे खरेतर सर्व संघर्षाचे मूळ कारण. आण्विक कार्यक्रमामुळे इराणवर अमेरिकेच्या पुढाकाराने अनेक निर्बंध लादले गेले. त्याला न जुमानता इराणने आपले धोरण कायम ठेवले. इराण आण्विक शस्त्रास्त्रांपर्यंत पोहोचू नये यासाठी अमेरिकेसह पाश्चात्य जग पुढे राहिले. इराणच्या काही अणुशास्त्रज्ञांची हत्या करण्यात आली. बराक ओबामा यांनी त्यांच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत इराणवरील निर्बंध सैल केले आणि इराणचा आण्विक कार्यक्रम आंतरराष्ट्रीय देखरेखीखाली आणला. तो करार डोनाल्ड ट्रम्प यांनी २०१८ मध्ये रद्द केला. तरी इराणला आण्विक प्रगती साधण्यात अडथळा आला नाही. २०१८ पासून आतापर्यंत इराणची त्याबाबत किती वाटचाल झाली आहे, याचा अंदाज घेण्यासाठी अमेरिका, इस्रायल यांना संधी हवी होती. इराणची सहानुभूती असलेल्या हमासने इस्रायलवर हल्ला केल्यानंतर ती हळूहळू जवळ येत गेली. सीरियातील दूतावासावर हल्ला करून ती आणखी जवळ आणली गेली आहे. इस्रायलसह आपली मित्र राष्ट्रे वगळता अमेरिकेची भूमिका जागतिक पोलिसाची असते. पश्चिम आशियातील अनेक देशांमध्ये याबद्दल चीड आहे. सरकारच्या कट्टरतावादी धोरणाने वाढलेली अस्वस्थता, ढासळलेली अर्थव्यवस्था यांसह अनेक समस्यांशी इराण आज झुंजत आहे. असे असताना देखील खामेनी यांनी हल्ल्याचा निर्णय घेतल्यावर इराणसह पश्चिम आशियातील बऱ्याच मुस्लिम देशांमध्ये नागरिकांमधून आनंद व्यक्त करण्यात आला. हमासने इस्रायलवर केलेला हल्ला घृणास्पद होता; पण त्या संघटनेविरोधात लढताना इस्रायलने गाझा पट्टीच उद्ध्वस्त करून टाकली. आता अमेरिका युद्ध विरामाच्या गोष्टी तोंडदेखल्या बोलत आहे. संयुक्त राष्ट्रासह कोणालाच दाद देण्यास इस्रायल तयार नाही. आता ते युद्ध सुरु असताना इराणच्या निमित्ताने पुन्हा युद्धाचा भडका उडणार आहे. इराणला आपल्या पाठबळाने इस्रायलकडून प्रत्युत्तर मिळणे ही निवडणुकीमुळे जो बायडेन यांची गरज आहे. त्यामुळे आपापले हितसंबंध जपण्यासाठी जागतिक शांतता धोक्यात आणण्यास ते आणि त्यांचे मित्र तत्पर राहतील, यात शंका नाही. युक्रेन - रशिया युद्ध रेंगाळत राहिले यालाही कथित लोकशाही देशांची विस्तारवादी भूमिकाच कारण ठरली. इराणच्या चाबहार बंदरामध्ये भारताचे हितसंबंध आहेत. शेकडो भारतीय कर्मचारी इराणमध्ये आहेत. इराण- इस्रायल युद्धाची व्याप्ती वाढणे भारतासाठी देखील चिंतेची बाब ठरणार आहे.

**ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया आपेक्षित आहे.**

– संपादक **यशवंत** लातूर

## सन आयझॅक न्यूटन ७०



विख्यात वैज्ञानिक सर आयझॅक न्यूटन यांचा जन्म २५ डिसेंबर १६४२ मध्ये नाताळच्या दिवशी लिंकशायरमधील वुल्स्थोर्प येथे झाला. वयाच्या बाराव्या वर्षी तो शाळेत गेला. लहानपणी वाऱ्याशिवाय चालणारी पवनचक्की व घटिका यंत्र अशा अनेक गोष्टी कल्पनाशक्तीने त्याने तयार केल्या होत्या. वयाच्या अठराव्या वर्षी तो मॅट्रिक पास झाला. केंब्रिज विद्यापीठाच्या त्रिनिटी कॉलेजमधून पदवी संपादन करताना त्याने गणित विषयातली वेगळी हुशारी सिद्ध केली. त्यामुळे १६६९ मध्ये त्याला गणिताचा प्राध्यापक म्हणून नेमणूक मिळाली.

काहीतरी सतत खटाटोपी करणारा न्यूटन लहानपणी एकदा बागेत बसला होत. तेव्हा त्याने समोरच्या झाडावरील एक सफरचंद खाली पडताना पाहिले आणि तो आश्र्चचकित झाला. हे सफरचंद आकाशाकडे न जाता खाली जमिनीवरच का पडले? पृथ्वीकडेच ते का खेचले गेले? या प्रश्नावर त्याने खूप विचार केला. त्यातूनच पुढे न्यूटनने 'वैश्विक गुरुत्वाकर्षणाचा नियम' शोधून काढला. या विश्वातील द्रव्याचा प्रत्येक कण हा इतर प्रत्येक कणाला एका प्रेरकाच्या द्वारा खेचीत असतो. कोणत्याही दोन कणांमधील आकर्षकणाच्या प्रेरकाचे मान हे त्या दोन कणांच्या वस्तुमानांच्या गुणाकारावर आणि त्या दोघांतील अंतराच्या व्यस्त वर्गावर अवलंबून असते. त्यामुळे कोणतीही वर फेकलेली वसतू परत पृथ्वीवर पडते.

न्यूटनने सूर्यमालिकेतल्या बऱ्याच ग्रहताऱ्यांच्या हालचाली, अंतरे याविषयी काही निष्कर्ष काढले. हे करताना त्या वेळचे गणित अपुरे पडायला लागले म्हणून न्यूटने १६६५ मध्ये 'कल्क्यूलस' नावाचा गणितप्रकार सुरू केला. पांढरा दिसणारा सूर्यप्रकाश हा प्रत्यक्षात सात रंगांचा बनलेला आहे हे लोलकाच्या साहाय्याने त्याने सात रंगांचे विभाजन करून दाखवले. यात सात रंगांच्या मिश्रणातून पांढरा रंग तयार होतो हे सिद्ध केले. बरीच वर्षे लपवून ठेवलेले संशोधन न्यूटनने मग १६८७ मध्ये प्रिन्सिपिया ग्रंथातून प्रसिद्ध झाले व विज्ञानाचा चेहरामोहराच बदलून गेला.

गुरुत्वाकर्षणाप्रमाणेच गतीचे तीन नियम मांडले होते. प्रथम म्हणजे 'कुठलीही वसतू जोपर्यंत बाहेरून कुठला जोर कुणी लावत नाही तोपर्यंत बाहेरून कुठला जोर कुणी लावत नाही तोपर्यंत आहे त्या स्थितीतच किंवा सरळ रेषेत प्रवास करीत राहते. दुसरं म्हणजे कुठल्याही वस्तूतील प्रवेग हा त्यावर लावलेल्या जोराच्या प्रमाणात बदलतो. आणि तिसरी गोष्ट म्हणजे क्रिया आणि प्रतिक्रिया हे समानच असतात.' म्हणजे आपण भिंतीवर बोट दाबलं तर तेवढाच जोर त्या बोटावर भिंतीमुळे पडतो.

'प्रिन्सिपिया' या प्रसिद्ध ग्रंथामुळे व विविध संशोधनामुळे १७०३ मध्ये न्यूटनला रॉयल सोसायटीचे अध्यक्षपद मिळावे. १६८९ साली न्यूटनची लोकसभेचा अध्यक्ष म्हणून निवड झाली होतीच. त्याच्या वृद्धावस्तेतही अवकाशातील वस्तूंबाबत त्याचे संशोधन सुरू होते. न्यूटनच्या ताकदीचा शास्त्रज्ञ पुढची अनेक शतकं झाला नाही. असा बुद्धिमत्तेचा दरारा असणारा 'वास्तवशास्त्राचा पिता' २० मार्च १२२७ मध्ये निधन पावला!

# प्रत्येक भावात राम

रामनवमी विशेष – ऊर्मिला राजोपाध्ये

रामनवमीच्या यंदाच्या उत्सवाला रामजन्मभूमीवर अतिशय देखणे मंदिर उभे राहण्याची आणि रामलल्ला आपल्या मूळ स्थानी विराजमान झाल्याच्या मंगलमय प्रसंगाची पार्श्वभूमी आहे. राम भारताच्या मातीमध्ये सामावलेला आहेच, पण अलीकडच्या घटनेने मातीतील माणसांना हरवलेल्या अस्मितेचेही दर्शन घडवले आणि अनोख्या पद्धतीने दिवाळी साजरी झाली. रामनवमीच्या निमित्ताने आणखी एक दीप प्रज्वलित होत आहे.

अलीकडेच देशाने दिवाळी नसतानाही दिवाळी साजरी केली. रामजन्मभूमीचा प्रश्न कायमचा मार्गी लागला आणि रामलल्लाला आपल्या मूळ स्थानी सन्मानपूर्वक प्रतिष्ठापित करण्याचे अनेक वर्षांचे आणि अनेक पिढ्यांनी पाहिलेले स्वप्न साकार झाले. तेव्हापासून सुरू झालेला रामनामाचा गजर थांबलेला नाही आणि थांबणारही नाही. श्रीराम नवमीच्या निमित्ताने रामजप उच्चारवात सुरू आहे.

रामाने आपल्या संपूर्ण जीवितकार्यात कळीकाळाला पुरुन उरतील, अशी तत्त्वे स्थापित केली. आपल्या आचरणातून अनेक सिद्धांत मांडले. आदर्शाचे अनेक मापदंड या देवतेच्या प्रत्येक कृतीतून दिसतात. म्हणूनच भारतीय समाज अन्नाप्रमाणेच या मौलिक विचारांवर वाढला आणि पोसला आहे असेही आपण म्हणू शकतो. प्रत्येक नातेसंबंधांमधली गुंफण म्हटली तर किती जटील आणि म्हटली तर किती सोपी असते, हे रामचरित्रामध्ये स्पष्टपणे दिसते. स्वत: वनवास भोगूनही दुसऱ्याच्या मदतीसाठी सज्ज असणारा, स्वत: दु:ख, पत्नी आणि अपत्यांचा वियोग सहन करून जनतेच्या मनातील शंका मिटवणारा, पराजय राहून प्रजेला आश्वस्त करणारा हा राजा आजही समाजाच्या मनात अढळस्थान राखून आहे. म्हणूनच त्याने सांगितलेल्या आदर्शांचे पालन करण्याचा नियम करत उत्साहाने रामनवमी साजरी करू या.दरवर्षी रामजन्माचा सोहळा म्हणजे आनंदाचा बहर असतो. मंदिरांमध्ये, घराघरांतून दुपारी बरोबर १२ वाजता रामजन्माचा सोहळा आनंदात पार पडतो. तो फारच प्रेक्षणीय असतो. विशेषत: स्त्री वर्गात उत्साहाला उधाण आलेले असते. रंगीत भरजरी साड्या नेसून, आभूषणे मिरवत, केसांमध्ये गजरे माळलेल्या सर्व वयोगटातल्या स्त्रिया रामजन्माचा सोहळा मोठ्या थाटामाटात साजरा करतात. देवळात मध्यभागी रंगीत पाळणा सुवासिक, रंगीबेरंगी फुलांनी सजवलेला असतो. त्याची दोरीसुद्धा फुलांनी, झिरमिळ्यांनी वेढलेली असते. देवळातल्या रंगीबेरंगी पताका आणि खांबावर सोडलेल्या फुलांच्या माळांमुळे देवळातील मंगल वातावरणात भर पडते. बहुतेक ठिकाणी रामजन्माच्या तास, दोन तास आधी प्रभू रामचंद्रावर कीर्तन सुरू होते. त्यासोबत कौसल्या मातेच्या डोहाळ्यांवरची मधुर गाणी गायली जातात. रामजन्माची वेळ झाली की, दुपारी १२ वाजता देवळात सजवलेल्या पाळण्यात प्रभू रामचंद्रांची मूर्ती ठेवली जाते. पाळण्याची दोरी हलक्या हातांनी मागे-पुढे करत, झोके देत रामजन्माची गाणी म्हणतात! राम जन्मला गं सखी, राम जन्मला' हे रामजन्माचे गाणे अत्यंत लोकप्रिय आहे. प्रत्येक ठिकाणी मंदिरांमधून हे गाणे मोठ्या आवाजात लावले जाते. त्यातील आनंदाच्या वात्सल्यपूर्ण भावना आणि मंदिरातल्या पाळण्याची दोरी हलवणाऱ्या सुवासिनी यांचा दृश्य मेळ पाहणाऱ्याच्या मनात आनंदलहरी उठवून जातो. खरेच परमेश्वररूपी राम माणसात जन्माला आला आहे की काय, असा मंगलमय भास होतो. त्यावेळी त्या सुखाचा अनुभव प्रत्येक भाविक घेत असतो. म्हणून आजही रामजन्माच्या सोहळ्याची पूर्वापार आवड उत्सवाच्या निमित्ताने जोपासली जाते.



रामजन्मानंतर मोठ्या आनंदात उपस्थितांना प्रसाद म्हणून सुंठवडा आणि साखरफुटाणे वाटले जातात. विविध सण वेगवेगळ्या प्रकारे, आनंद घेत साजरा करण्याची समृद्ध परंपरा भारताइतकी कुठेही नसेल. प्रत्येक देवदेवतेचा सण वेगवेगळ्या पद्धतीने साजरा होतो. प्रभू रामचंद्रांबद्दल भारतीयांना अमर्याद आत्मीयता आहे. याचे मूळ कारण म्हणजे प्रत्येकाला चराचराचा कारभार निर्वेध चालावा असे वाटत असते. किंबहुना, तशी प्रत्येक सजीवाची इच्छा असते. जगात सर्व काही छान चालावे, आदर्शवाद समोर ठेवून जगरहाटी पुढे चालावी, सर्वांच्या पदरात न्यायाचे सारखेच दान पडावे आणि त्यासाठी संरक्षण देणारा दयाळू आणि प्रेमळ राजा असावा, अशी आशा सर्वसामान्यांना असते. असा एक राजा एके काळी अस्तित्वात होता, असे रामायणातल्या कथांमधून, ग्रंथांमधून स्पष्ट झाले आणि प्रत्येक माणूस त्या राजापुढे मनोमन नतमस्तक झाला. त्याच्या चरणस्पर्शासाठी अधीर झाला. अयोध्येचा राजा प्रभू रामचंद्र प्रत्येक भारतीयाच्या हृदयसिंहासनावर कायमचा आरूढ झाला. काय नव्हते या अलौकिक शक्तीशाली राजाच्या व्यक्तिमत्त्वामध्ये? त्रेतायुगामध्ये कौसल्या राणीच्या पोटी जन्मलेला हा पुत्र महापराक्रमी होता. वसिष्ठ ऋषींच्या आश्रमातल्या यज्ञात अडथळा आणू पाहणाऱ्या राक्षसांचा त्याने कुमारवयात असतानाच संहार केला. त्याच वेळी प्रभू रामचंद्रांच्या पराक्रमी गुणाची ग्वाही पिता दशरथ राजाला मिळाली होती.


वास्तविक, प्रभू रामचंद्र हा दशावतारांमधला पाचवा अवतार मानला जातो. पृथ्वीवर एखाद्या दुष्ट शक्तीचे अराजक माजले, तर ईश्वर वेगवेगळ्या रूपात अवतार घेऊन दुष्टांचा विनाश करतो. तसेच प्रभू रामचंद्रांनीही लंकेचा उन्मत्त राजा असलेल्या रावणाचा संहार करण्यासाठी जन्म घेतला, अशी कथा सर्वश्रुत आहे. मुलावरील अपार विश्वासापोटी दशरथाने राज्यकारभार प्रभू रामचंद्रांवर सोपवला होता. पण त्याच जनतेने त्यांची प्राणप्रिय पत्नी सीतामाईच्या चारित्र्याला बोल लावले तेव्हा तो जनतेवर किंचितही रागावला नाही; उलट, जनतेच्या मनातील न्यायदानाची भावना सुरक्षित राहावी यासाठी त्याने प्रिय पत्नीचाही त्याग केला! जनतेसाठी स्वत:च्या सुखाचा त्याग करणारा दुसरा राजा पुराणात नाही. एक माणूस म्हणून जन्माला आल्यावर या ईश्वराने माणसाच्या आदर्शवादाच्या मर्यादा प्रसंगी जीवाचे, सर्व सुखांचे मोल देऊन सांभाळल्या. म्हणून माणसातल्या या सर्वोत्तम पुरुषाला मर्यादा पुरुषोत्तम' हा सन्मान मिळाला. हा राजा इतका गुणी असूनही संसार सुखापासून वंचित राहिला. पत्नीविरहाचे दु:ख त्याने अबोलपणे सहन केले. ज्योतिष विद्येच्या दृष्टीने म्हणतात की, प्रभू रामचंद्रांच्या जन्माच्या वेळी सूर्य मेष राशीत नवव्या स्थानावर असल्यामुळे प्रभू रामचंद्रांना गृहसौख्य मिळाले नाही. सूर्य दहाव्या स्थानात असता तर रामाला हे सुख मिळाले असते, असा एकवचनी, एकपत्नी आणि एकबाणी राम अत्यंत लोकप्रिय असूनही त्याला वनवासात जावे लागले. माता कैकयी सावत्र असूनही तिच्या एका शब्दाच्या आदेशानुसार त्याने तत्क्षणी वनवासाची वाट धरली. त्यावेळीही त्याने कैकयी मातेला किंचितही दूषण न देता पित्याची समजूत काढली. प्रत्येक वेळी रामाच्या चरित्रात ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, स्वत:च्या दुर्दैवी आयुष्याबद्दल त्याने कधीही कोणालाही बोल लावले नाहीत; उलट, स्वत:चे प्रारब्ध समजून प्राप्त परिस्थितीचा आनंदाने स्वीकार केला. विशाल मनाची अन् सहनशीलतेची दिव्य प्रतिमाच जणू ती!

आजची सामाजिक परिस्थिती लक्षात घेता रामचरित्राच्या अभ्यासाची गरज प्रकर्षाने जाणवते. आज चौकटीत अडकणाऱ्या तरुणाईला तत्त्वनिष्ठ रामाच्या आयुष्याचा आदर्श पुढे ठेवण्याची आवश्यकता आहे. जवळ संपत्ती असली की नशेच्या आहारी जाऊन, माता-पित्यांना बदनाम करणाऱ्या तरुणांना प्रभू रामचंद्रांच्या माता-पित्यांप्रती प्रेमाचे उदाहरण द्यायला हवे. आपल्या व्यसनाधीन आयुष्याने आई-वडिलांना चिंतेत टाकणाऱ्या या पिढीला, माता कैकयीच्या एका आज्ञेखातर वनवासात जाणाऱ्या रामाची गोष्ट सांगायला हवी. आई-वडिलांची आज्ञा पाळणे हे मुलांचे कर्तव्य, त्यांचा शब्द मोडणे म्हणजे पाप हे समजून घ्यायला हवे. कारण आई-वडील सांगतात ते हिताचेच असते, याचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही! म्हणतात ना, कैकयीला रामाला वनवासात पाठवण्याची बुद्धी का झाली? तर त्यानंतर वनवासातील सीताहरणाची घटना घडून त्यानिमित्ताने रावणाचा विनाश व्हावा, असा ईश्वरी संकेत होता. हे नाट्य ईश्वराने घडवलं. रामकथेतील बंधुप्रेमाच्या कहाणीचा गोडवाही अवीट आहे. भरताला राज्यभिषेकाचा आग्रह करून, प्रभू रामचंद्रांनी भावंडावर किती प्रेम करावे याचा दाखलाच दिला आहे. आज संपत्तीच्या वाटणीवरून भावाभावांमध्ये दुरावा निर्माण झालेला दिसतो.

कित्येकदा तर मारामाऱ्या, खुनापर्यंत मजल जाते. अशा वेळी रामायणातल्या बंधुप्रेमाचा आदर्श स्वीकारण्यात आपण कितपत यशस्वी झालो, असा प्रश्न पडतो. रामायणासारखे आदर्शवादी ग्रंथ पूजनीय म्हणून केवळ डोक्याला लावून नमस्कार करणे पुरेसे नाही. त्यातला आदर्शवाद प्रत्यक्षात आणणे हीच त्या ग्रंथाची खरी पूजा ठरेल. अशा आदर्शवादाची आठवण ठेवण्यासाठीच साजरा करावा हा रामनवमीचा उत्सव! आधी उल्लेख केल्याप्रमाणे यंदा तर प्रभू रामचंद्र आपल्या मूळ स्थानी विराजमान झाले आहेत! त्या भव्य मंदिराचा लौकिक देश-विदेशामध्ये पोहोचत आहे.

भक्तगण मोठ्या संख्येने आपल्या प्रिय देवतेच्या दर्शनासाठी गर्दी करत आहेत. सावळा रामचंद्र त्यांना सुहास्य वदनाने दर्शन देत आहे. खरे सांगायचे तर या घटनेने रामलल्लाला आपले स्थान मिळाले आहेच, पण त्याचबरोबर देशाला आपली हरवलेली अस्मिताही गवसली आहे. त्यामुळेच यंदाची रामनवमी अस्मिताजतनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण म्हणायला हवी.

## राशी भविष्य



२१ एप्रिल २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम
मित्रांच्या सहकार्याने आपली अडकलेली काम पार पडतील. आपल्याला विशेषाधिकार प्राप्त होतील. आरोग्याची काळजी घ्या. कौटुंबिक वातावरण आनंदमय राहील.

वृषभ : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा : पूर्व
आपली बुद्धीवादी समस्या सुटेल. सुख समृद्धी वाढेल. हलगर्जीपणाची कामे टाळा. घाईगडबडीने कामे करू नका. वाचनाची आवड लागेल.

मिथुन : शुभ रंग: काळा, शुभ दिशा : दक्षिण
कार्यक्षेत्रात भरभराटीचे योग आहेत. ओळख वाढेल. नवीन कामकाजामुळे आपल्याला मान मिळेल. रागावर नियंत्रण ठेवणे जरूरीचे आहे.शक्यतो प्रवास करण्याचे टाळा.

कर्क : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
व्यवहारात अडचणी येतील. परेशानी व धावपळ वाढेल. परिश्रमाच्या मानाने त्याचे फळ कमी मिळेल. खर्चात कपात करावी. मुलांना व्यवहारात जास्तीचे कष्ट करावे लागतील.

सिंह : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व
वाद-विवाद, भांडण तंटे होण्याची शक्यता. धंद्यात लक्ष द्या. वेळीच लक्ष न दिल्यास नुकसान होवू शकते. अभ्यासाची आवड लागेल.

कन्या : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: पूर्व
आपल्या योजनेप्रमाणे कार्य पार पडतील. सौजन्यपूर्वक व्यवहार आपल्याला अडचणीतून वाचवील. खर्चात काटकसर करणे आवश्यक आहे. व्यापारात नवीन संबध प्रस्थापित होतील.

तुळ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा: पश्चिम
व्यापारात अचानक परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. व्यापारात वाढ होईल. ओळखीच्या किंवा नातेवाईंकाशी वाद विवाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वृश्चिक : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:उत्तर
नवीन योजना अमलात आणाल. परिवारात वातावरण चांगले राहील. आर्थिक स्थिती चांगली. जास्तीची आशा ठेवू नका. धंद्यात लाभ होईल.

धनु : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पश्चिम
आवक-जावक वाढेल. चलाखीमुळे थांबलेली कामे पूर्ण होतील. यश, प्रतिष्ठा वाढेल. जबाबदारीचे काम सांभाळून करा.

मकर : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
जी कोणीही व्यक्ति आपल्या संपर्कात येईल तिला आनंदच वाटणार आहे. कामाच्या प्रती बेजबाबदार राहू नका. कौटुंबिक जिवन आनंदमय राहील.

कुंभ : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
आपले मन धार्मिक, अध्यात्मिककडे झुकल्याने मानसिक शांती मिळेल. जीवनसाथीकडून आपल्याला पूर्ण सहकार्य मिळेल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

मीन: शुभ रंग: पांढरा, शुभदिशा:उत्तर
मित्र व हितचिंताकांच्या भेटी होतील आईची तब्येत ठिक राहील. गृहोपयोगी वस्तू खरेदी करण्याचा योग, उद्योग धंदा चांगला चालेल.

१८ एप्रिलला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य, शनी व जास्तीत जास्त मंगळाचा प्रभाव आहे. तुमचे बरेचसे जीवन संघर्षमय असते. विरोधातूनच वाटचाल करण्याची पाळी तुमच्यावर येते. कुटुंबात जुन्या नव्या पिढीचे मतभेद होण्याचा संभव असतो. सहकाऱ्यांशी जमवून घेण्यास कष्ट पडतात. कुणाच्या हाताखाली काम करणे तुम्हाला आवडत नाही. सत्ता, अधिकार उपभोगण्यासाठीच आपला जन्म झाला आहे अशी तुमची धारणा असते. तुमचा आत्मविश्वास प्रचंड असतो. कुठलेही आव्हान तुम्ही तत्परतेने स्वीकारता व ते पूर्ण करूनच मग स्वस्थ बसता.

प्रत्येक काम स्वत:च्या हिमतीवरच पुढे रेटले पाहिजे अशी काही जबरदस्ती नाही. इतरांच्या सहकार्याचा हात नाकारू नका. आपल्या क्रोधावर, संतापावर नियंत्रण ठेवा. त्वचाविकार, रक्तदाब, डोकेदुखी टाळण्यासाठी कोठा साफ ठेवा. तिखट, तेलकट पदार्थ, चरबीयुक्त आहार शक्यतो टाळा.

कार्यक्षेत्र : लष्कर, पोलिसखाते, होमगार्ड, अग्निप्रतिबंधक दल वगैरे खात्यात तुमच्या धाडसी व महत्वाकांक्षी वृत्तीला वाव मिळेल. तंत्रनैपुण्य प्राप्त करून घेण्याची क्षमता अंगी असल्याने मोटार कारखाने, यंत्रदुरूस्तीच्या कार्यशाळा, बीज इंधने यांचे उद्योग यात प्रवेश करण्यासाठी अभियांत्रिकीची पदवी मिळवण्याचा प्रयत्न करा. त्वचारोगतज्ज्ञ, प्लॅस्टिक सर्जन, हृदयविकारतज्ज्ञ, शल्यविशारद म्हणूनही प्रख्यात होण्याची शक्यता आहे.

प्रणयी जीवन : उतावळेपणाने, भावनेच्या आहारी जाऊन कोणताही निर्णय घेऊ नका. नाहीतर प्रेमभंगाचे दु:ख सहन करावे लागेल किंवा पुढे आपल्या मनोवृतीशी न जमणाऱ्या जोडीदाराबरोबर आयुक्त काढावे लागेल. तुमच्या साहसी वृत्तीला उत्तेजन देणारा, तुमच्या पराक्रमाचे कौतुक करणारा जोडीदार तुम्हाला आवडतो. या दृष्टीने २१ एप्रिल ते २० मे दरम्यानच्या व्यक्तीची निवड करा.

वर्षफळ : प्रकृतीमान उत्तम राहील. उदंड उत्साहाने काम करू शकाल. नवी आव्हाने पेलता येतील. जानेवारी फेब्रुवारी मध्ये नवी जागा खरेदी करण्याचे स्वप्न साकार होईल. मार्च एप्रिल मध्ये परदेशी कंपन्यात शिरकाव करून घेण्यासाठी तंत्रनैपुण्य संपादन करा. जून जुलै मध्ये राजकारण्यांच्या वर्तुळात मानाचे स्थान मिळेल. आक्रमक भाषणे, प्रवास दौरे नेतृत्व मिळण्यासाठी उपयुक्त ठरतील. ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये स्वतंत्र धंद्याची मुहूर्तमेढ रोवता येईल.

महत्वाचे वर्ष :९, १८, २७, ३६, ४५, ५४, ६३, ७२.

भाग्यरत्न : पोवळे

याच तारेखेची व्यक्ती : धों. के. कर्वे, ललिता पवार, सविता प्रभुणे

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीमध्ये महात्मा बसवेश्वरांचे अतुलनीय योगदान: बेंबरे



**लातूर : / प्रतिनिधी-** बाराव्या शतकामध्ये महात्मा बसवेश्वरांनी संपूर्ण विश्वात सामाजिक आणि सांस्कृतिक क्रांती घडवून आणून महाराष्ट्रामध्ये मानवतावाद रुजविण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न केला त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीमध्ये महात्मा बसवेश्वर यांचे योगदान अतुलनीय आहे असे प्रतिपादन मराठवाड्यातील सुप्रसिद्ध लेखक व शरण साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. रवींद्र बेंबरे यांनी बोलताना व्यक्त केले.

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था लातूर द्वारा संचलित व्याख्यानमाला संयोजन समिती आणि आयक्युएसी, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवेश्वर व्याख्यानमाला २०२३-२४ च्या उद्घाटन प्रसंगी आणि महात्मा बसवेश्वर आणि महाराष्ट्र एक अनुबंध या विषयावर पहिले पुष्प गुंफत असताना ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारमंचावर उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, आयक्युएसी समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, संयोजक डॉ. रत्नाकर बेडगे आणि डॉ. मनोहर चपळे आदीची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून दीप प्रज्वलनाने सुरुवात करण्यात आली यानंतर प्रा. विश्वनाथ स्वामी आणि प्रा. सरस्वती बोरगावकर यांनी नाद ब्रह्मस्त्वन सादर केले.

पुढे बोलताना डॉ. रवींद्र बेंबरे म्हणाले की, महात्मा बसवेश्वरांच्या कल्याण क्रांतीचा कृती आराखडा महाराष्ट्रात तयार झाला. त्यांच्या संपूर्ण कार्याची पार्श्वभूमी ही महाराष्ट्रच आहे. महात्मा बसवेश्वर हे मध्ययुगीन तथागत गौतम बुद्ध होत त्यांनी मध्ययुगात अनुभव मंडपाच्या माध्यमातून आदर्श अशी लोकसंसद निर्माण केली. बारावी शतकात या अनुभव मंडपाचे ७७० लोकप्रतिनिधी होते. महात्मा बसवेश्वरांनी तत्कालीन प्रस्थापित व्यवस्थेला धक्का देऊन पुरोगामी समता आधारलेले विचार रुजविले. असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनी केले. प्रमुख अतिथी यांचा परिचय डॉ. मनोहर चपळे यांनी करून दिला.

या कार्यक्रमामध्ये नवनियुक्त पी एस आय अजय काळे यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, महात्मा बसवेश्वर यांच्या नावाने चालणारी महाराष्ट्रातील ही एकमेव तीन दिवसीय व्याख्यानमाला आहे. आज महात्मा बसवेश्वर आणि महाराष्ट्र एक अनुबंध या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण आणि चिंतनीय विवेचन डॉ. रवींद्र बेंबरे यांनी आपल्या मार्गदर्शनातून केले. त्याबद्दल त्यांनी गौरव उदगार काढून उद्या दुसरे पुष्प सोलापूर येथील सुप्रसिद्ध साहित्यिका तथा मसापच्या अध्यक्षा प्रा. डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर ह्या योगिनी अक्कमहादेवीच्या विचारांची प्रासंगिकता या विषयावर गुंफणार असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किसनाथ कुडके यांनी केले तर आभार डॉ. शितल येरुळे यांनी मानले. या व्याख्यानमालेला माजी प्राचार्य डॉ. एम् एस् दडगे, केंद्रप्रमुख सुनील हेंगणे, दुर्वासराव गवई, प्रभाकर सायगांवकर, डॉ. ज्ञानदेव राऊत, डॉ. बालाजी भंडारे, डॉ मारुती गायकवाड यांच्यासह लातूर शहरातील बसव प्रेमी, संशोधक, अभ्यासक, वरिष्ट व् कनिष्ट महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व् विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजन समितीचे प्रा. व्यंकट दुडीले, डॉ. अश्विनी रोडे, डॉ. टी. घनश्याम, प्रा. कल्पना गिराम आदींसह महाविद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार ची लातूर जिल्हा कार्यकारिणी जाहीर : संजय शेटे

लातूर : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)ची सर्वसमावेशक लातूर जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आल्याची माहिती जिल्हाध्यक्ष संजय शेटे यांनी दिली. जाहीर करण्यात आलेली कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे.

जिल्हा उपाध्यक्ष : व्यंकटराव पाटील, सुभाष पवार, मोहन भोसले गुरुजी, योगीराज पाटील, विनायक बगदुरे, तुकाराम पारवे, अशोक चिंते, धनाजी कोयले, रघुवीर जाधव - पाटील,जिल्हा प्रवक्ता : रामराजे अत्राम ,कार्यालयीन सरचिटणीस पुरुषोत्तम पाटील, सरचिटणीस : जीवन पाटील, शंकर मुक्कावार, संदीप मोरे, बाबुराव सुरवसे, नरेंद्र पाटील, रुपेश चक्रे, शंकर पाटील, सचिव : अण्णासाहेब शिंदे, बाळासाहेब देशमुख, गोविंद शिवलकर, अनंत चट , दिगंबर बिराजदार, केदार काडवादे, मन्मथ कोनमारे,शिवराज पाटील,माधवराव पाटील,राजाभाऊ माने, योगेश बिराजदार, इद्रिस भातंबरे, नारायण नागरगोजे, सहसचिव : दिलीप लवटे , बाबुराव कनाळे , मोहनराव पाटील,भास्कर कदम, मोहन माने,राम गुन्हाळे, हसन मोमीन, अतिक पटेल, संघटक सचिव : दिलीप लोहार, एड. विजयकुमार राजेमाने, रामेश्वर बिरादार, वृषीक येरमे, शिवा आंबेगावे , सय्यद सिजाउद्दीन , शिवाजी बिबिनवरे, सत्यनारायण बिरादार, सह संघटक सचिव : सुरेश रोळे , पंढरी चामले , संतोष बोचरे, बाबू दोपारी ,निलंगा विधानसभा अध्यक्ष विलास माने, कार्याध्यक्ष माधव सोनवणे, सय्यद सौदागर, निलंगा तालुका अधयाकाह सुधीर मसलगे, तालुका कार्याध्यक्ष प्रवीण कवटकर , लक्ष्मण क्षीरसागर, निलंगा शहर अध्यक्ष इफरोज शेख, शहर कार्याध्यक्ष बसवराज पाटील, एड. गोपाल इंगळे.

शिरूर अनंतपाळ तालुका अध्यक्ष कल्याण बरगे, कार्याध्यक्ष हरिश्चंद्र कोतवाडे, गंगाधर शिंदे, शिरूर अनंतपाळ शहराध्यक्ष व्यंकट हंद्राळे, कार्याध्यक्ष संदीप धुमाळे,देवणी तालुका अध्यक्ष अमरनाथ मूर्के, कार्याध्यक्ष अंकुश गायकवाड, व्यंकटराव बिरादार, देवणी शहर अध्यक्ष फकीर बुदरे , कार्याध्यक्ष सोमनाथ रावळे , रविशंकर बिराजदार, अहमदपूर-चाकूर विधानसभा अध्यक्ष श्रीमंतराव शेळके,कार्याध्यक्ष राम नरवटे , अहमदपूर तालुका अध्यक्ष राम बेलकाले , कार्याध्यक्ष प्रदीप खोमणे, रुपेश शेळके, अहमदपूर शहर अध्यक्ष जरान पठाण, कार्याध्यक्ष दीपक हलसे , चाकूर तालुका अध्यक्ष शिवाजी बैनगिरे , कार्याध्यक्ष दयानंद सूर्यवंशी, चाकूर शहर बाबूमियाँ दापकेवाले, औसा विधानसभा अध्यक्ष एड. यशवंत भोसले, औसा तालुका अध्यक्ष शामराव साळुंके, कार्याध्यक्ष अमर बिराजदार, औसा शहर अध्यक्ष सनाउल्ला शेख, लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघ अध्यक्ष मदन काळे, लातूर तालुका अध्यक्ष बक्तावर बागवान,रेणापूर तालुका अध्यक्ष बालाजी कदम, रेणापूर शहराध्यक्ष सय्यद मुस्तफा, उदगीर विधानसभा मतदार संघ अध्यक्ष अजित पाटील, कार्याध्यक्ष धोंडीराम पाटील, उदगीर तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, उदगीर शहर अध्यक्ष अजिमोद्दीन दायमी, कार्याध्यक्ष गजानन सताळकर , जळकोट तालुका अध्यक्ष नेमीचंद पाटील, कार्याध्यक्ष बालाजी बारमाळे , जळकोट शहर अध्यक्ष बसवराज काळे, कार्याध्यक्ष नयूम कोतवाल. या कार्यकारिणीत जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील पदाधिकाऱ्यांना सामावून घेण्यात आले असल्याचे जिल्हाध्यक्ष संजय शेटे यांनी सांगितले.



# फ्री व्हाईस ग्रुपच्या मॅरेथॉनमध्ये बाभळगाव महाविद्यालयाच्या मुलींचे यश

बाभळगाव ; दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव या महाविद्यालयाच्या खेळाडूनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीच्या निमित्ताने फ्री व्हाईस ग्रुप, लातूरच्या वतीने भीम फेस्टिवल - २०२४ मध्ये Run for opportunity, Run for equality या शीर्षकाखा आयोजित करण्यात आलेल्या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये गुणानुक्रमे चौधरी अंजली सचिन- प्रथम, आडे सोनी व्यंकट - द्वितीय आणि पेठे आरती भगवान - तृतीय यांनी क्रमांक मिळवून यावर्षीच्या फ्री व्हाईस मॅरेथॉन - २०२४ ट्रॉफीवर महाविद्यालयाचे नाव कोरले आहे.

शहरातील दयानंद सभागृहामध्ये झालेल्या भीम फेस्टिवलच्या बक्षीस वितरण समारंभामध्ये डॉ. विजय अजनीकर, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, डॉ. हर्षवर्धन कोल्हापुरे, डी. एस. नरसिंगे, ड.राजकुमार गंडले यांच्या उपस्थितीमध्ये रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देऊन विजय खेळाडूंचाविजय खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. या यशाबद्दल दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगाव, अध्यक्ष आ. धीरज देशमुख, सचिव शाम देशमुख, प्राचार्य डॉ. कटारे, क्रीडा संचालक डॉ. वैशाली माढेकर, स्टाफ सचिव जयदेवी पवार, बाळासाहेब देशमुख, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

## भोसले हायस्कूलचे एनएमएमएस शिष्यवृती परीक्षेत यश

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) - येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलने याही वर्षी एनएमएमएस शिष्यवृती परीक्षेत सातत्य राखत घवघवीत यश संपादन केले. या परीक्षेत १७ विद्यार्थ्यांना केंद्र सरकारची राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठी असलेल्या या शिष्यवृत्ती परीक्षेत यश प्राप्त केले. यामुळे प्रत्येक वर्षाला या सर्व मुलांना त्यांच्या बारावीच्या शिक्षणापर्यंत १२००० एवढी शिष्यवृत्ती मिळणार आहे. या प्रशालेतून प्रथम अनुष्का सावंत अनुष्का, द्वितीय आयुष कुलकर्णी तर तृतीय वरद म्हेत्रे यांनी क्रमांक पटकावला. तर १७ विद्यार्थी या विभागाचे प्रमुख अ.आ. जाधव तसेच इ.८ वी चे पर्यवेक्षक एन.एन. गोरे यांचे प्रशालेच्यावतीने प्राचार्य साहेबराव देशमुख यांनी सत्कार केला. यावेळी उपप्राचार्य संतोष घार्गे, उपमुख्याध्यापक सिद्धेश्वर कोळी, पर्यवेक्षक वाय.के. इंगळे, राजेंद्र जाधव, निखिल गोरे, सुनील कोरडे, धनंजय देशमुख, बी.बी. गुंड आदी उपस्थित होते. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील, सचिव प्रेमाताई पाटील, प्रशासकीय अधिकारी आदित्य पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व अध्यापन करणाऱ्या अध्यापकांचे कौतुक केले.

# एसव्हीएसएस फिजिओथेरपी महाविद्यालयाचा पदवी वितरण सोहळा



**लातूर :** महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक अंतर्गत श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित एस व्ही एस एस लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी लातूर येथील विद्यार्थ्यांना लातूर जिल्हा परिषदेचे सीईओ मा.अनमोल सागर व दिशा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.अभिजीत देशमुख यांच्या हस्ते पदवी प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन आणि कोन्विकेशन मार्च व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे मंचावर सचिव वेताळेश्वर बावगे, कोषाध्यक्ष शिवलिंग जेवळे, संचालक नंदकिशोर बावगे, संचालिका माधुरी बावगे, प्राचार्या डॉ.श्यामलीला जेवळे, प्राचार्य डॉ वीरेंद्र मेश्राम यांची प्रमुख उपस्थिती होती.

लातूर जिल्हा परिषदेचे सीईओ यांचा सत्कार सचिव वेताळेश्वर बावगे यांनी केले, प्रस्ताविक व महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल प्राचार्य डॉ. वीरेंद्र मेश्राम यांनी सादर केले .अनमोल सागर यांनी फिजिओथेरपी मध्ये करिअरच्या खूप संधी उपलब्ध आहेत त्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रामाणिक कष्ट करणे महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन केले . तसेच डॉक्टर व्यवसायामध्ये चांगल्या प्रतीची पेशंटची गुणवत्ता वाढविणे हे तुमच्या कर्तव्याला मदत होईल असे प्रतिपादन दिशा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभिजीत देशमुख यांनी केले.

विद्यार्थ्यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पदवी वितरण करून शपथ देण्यात आली. तसेच याप्रसंगी डॉ. पल्लवी तायडे, डॉ.अखिलेश बिवलकर आणि डॉ प्रतीक्षा गावडे यांना २०२३-२४ चा अकॅडमीक अचीवमेंट अवॉर्ड देण्यात आला. त्याचबरोबर बेस्ट आऊट गोइंग इंटन अवार्ड उर्स्या सय्यद या विद्यार्थिनींला देण्यात आला.याप्रसंगी डॉ. पल्लवी तायडे, डॉ.शारदा धडे, डॉ श्रद्धा नागमोडे,डॉ. पवन कुमार, डॉ.अर्निका राजपुरिया ,डॉ. अखिलेश बिवलकर ,डॉ. प्रतिभा शेटकर, डॉ. गायत्री बतकूलवार व संस्थेतील सर्व युनिटचे प्राचार्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निशाद सय्यद व साक्षी काळे यांनी केले. तर आभार कोषाध्यक्ष शिवलिंग जेवळे यांनी मानले.

# श्री महादेव विद्यालयाचा माजी विद्यार्थी आशिष सोलापुरे याची आयआय टी जाम परीक्षेत यश

वलांडी -देवणी तालुक्यातील धनेगाव येथील श्री महादेव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा माजी विद्यार्थी आशिष सोलापुरे याने आयआयटी जाम परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.



मद्रास येथे घेण्यात आलेल्या आयटी जाम या राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षेत आशिष सोलापुरे याचा रसायनशास्त्र या विषयांमध्ये देशात २६२ वा रँक आहे.आयआयटी,आयआय एससी,एनआटी या नामांकित संस्थेमध्ये प्रवेश मिळणार आहे. आशिषचे पाचवी ते बारावी पर्यंतचे शिक्षण श्री महादेव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय धनेगाव ता देवणी येथे झाले. व बीएससीचे शिक्षण राजश्री शाहू महाविद्यालयांमध्ये झाले. आशिष सोलापुरे याची घरची परिस्थिती हलाखीची असताना देखील याची जाण ठेवून कष्टाच्या बळावर आशिषने राजश्री शाहू महाविद्यालय लातूर येथे बीएससी रसायनशास्त्र विषयांमध्ये चांगला अभ्यास करून त्याने राष्ट्रीय स्तरावरील आयआयटी जाम या प्रवेश परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष शिक्षण महर्षी दलित मित्र डी्.बी. लोहारे गुरुजी, अध्यक्ष इंजिनियर अनिल मुळे, सचिव डॉ प्रा सौ सुनीताताई चवळे, कोषाध्यक्ष डॉ भालचंद्र पैके, प्राचार्य रामलिंग मुळे, पर्यवेक्षक चंद्रकांत बंडगर, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी अभिनंदन व कौतुक केले.



# महायुतीचे उमेदवार खा. श्रृंगारे यांना रेणापूर तालुक्यातून मोठे मताधिक्य देणार : कदम

रेणापूर/प्रतिनिधी : लातूर लोकसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे यांना रेणापूर तालुक्यातून मोठे मताधिक्य मिळवून देण्यासाठी तालुक्यातील महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते कामाला लागले आहेत. गतवेळच्या तुलनेत यावेळी अधिक मताधिक्य मिळवून देऊ, असा विश्वास भाजपाचे जिल्हा चिटणीस गंगासिंह कदम यांनी व्यक्त केला.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, सुपर वॉरियर्स व बुथ प्रमुखांच्या बैठका घेण्यात येत आहेत. त्याअंतर्गत आंदलगाव येथे झालेल्या बैठकीत कदम बोलत होते. उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, ज्यांनी राम मंदीर उभारणीस विरोध केला, ज्या मंडळींनी ३७० कलम हटविण्यास विरोध केला, त्यांना या निवडणुकीत हद्दपार करा. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हाती पुन्हा एकदा सत्ता देण्याची गरज आहे. यासाठी लातूर लोकसभा मतदारसंघातून भाजपा महायुतीचे उमेदवार सुधाकर श्रृंगारे यांना आपण मोठ्या मताधिक्याने निवडुन देणे आवश्यक आहे. यासाठी सर्व घटक पक्षांशी समन्वय ठेवून आपण काम केले पाहिजे, असेही ते म्हणाले.

# भगवान महावीर जयंतीनिमित्त लातुरात भरगच्च कार्यक्रम

लातूर / प्रतिनिधी– लातूर येथे येत्या २१ एप्रिल रोजी भव्य प्रमाणात २६२३ वा भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव साजरा होणार असून, त्यानिमित्त आंतरराष्ट्रीय ख्यातीचे नामवंत वक्ते व जैन धर्माचे अभ्यासक डॉ. श्रीमंत कोकाटे यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यान आयोजिण्यात आले आहे.

सकल जैन समाज, लातूरच्या वतीने आयोजित या महोत्सव कार्यक्रमानुसार जैन गल्ली येथील दिगंबर जैन मंदिर येथून २१ एप्रिल रोजी पहाटे ६.३० वा. प्रतिमा पालखीसह जैन समाजाची प्रभातफेरी निघणार असून, ती पटेल चौक, खडक हनुमान, जिवराज भवन, सेंट्रल हनुमान, दयाराम रोड, सुभाष चौक, गंजगोलाई, हनुमान चौक मार्गे चंद्रनगरस्थित वर्धमान उद्यान येथे विसर्जित होईल. तेथे सकाळी ९ वा. ध्वजवंदन संपन्न झाल्यानंतर स्वागताध्यक्ष प्रा. महावीर उदगीरकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार्या जाहीर कार्यक्रमात प्रमुख वक्ते डॉ. श्रीमंत कोकाटे यांचे जैन तत्वज्ञानावर सखोल व अभ्यासपूर्ण व्याख्यान होईल, अशी माहिती लातूर जैन मंडळाचे अध्यक्ष सीए तेजमलजी बोरा यांनी दिली. जयंती उत्सवानिमित्त याच दिवशी दुपारी १२ ते ३ या वेळेत जीवराज भवनामध्ये अनिल डुंगरवाल आणि सुनिल दर्डा यांच्या संयोजनाखाली भव्य रक्तदान शिबीर आयोजिण्यात आले आहे. तसेच महोत्सवाचे औचित्य साधून तेरा पंथ महासभेने १५ ते २० एप्रिल दरम्यान योगगुरु दीपक गटागट यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# गांजूरच्या शिवारात बरसला कवितांचा पाऊस



लातूर / प्रतिनिधी- मराठवाडा साहित्य परिषद शाखा लातूरच्या वतीने मौजे गांजूर येथे विठ्ठल मोरे साहित्यनगरीत चौथे शिवार साहित्य संमेलन संपन्न झाले.प्रसिद्ध कवी योगीराज माने यांच्या अध्यक्षतेखाली गांजूर येथील कविसंमेलनात नानाविध कवितांचा पाऊस पडला. माय, बाप, रानशिवार, बळीराजा, वैशाखाचं ऊन, प्रेम,देशभक्ती अशा असंख्य विषयांवर सादर झालेल्या कविता व गझलांनी उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. प्रारंभी योगीराज माने यांनी तळहातावर । मिटलेल्या रेषा ।घट्टयाचा नकाशा । बाप माझा ।। दुष्काळी प्रश्नाला ।कष्टाचे उत्तर । घामाचे अत्तर । बाप माझा ।। हा हृदयस्पर्शी अभंग सादर करून श्रोत्यांना भावूक केले.

गांजूर ही प्रा. विठ्ठल मोरे यांची जन्मभूमी. डाव्या पुरोगामी चळवळीतील, प्राध्यापक संघटनेतील त्यांचे योगदान सर्वश्रुत आहे. या गावाच्या शिवारात संमेलन होतंय , हे औचित्य साधून त्यांच्याविषयीच्या कृतज्ञतेचा भाव सुनिता मोरे यांनी आपल्या मविठ्ठलफ कवितेतून मांडला. राऊळातील विठ्ठल वैकुंठाला गेला.. सुनी झाली पंढरी साद घालू कोणाला... अडल्या नडल्याची रोज व्हायची वारी.. रिकाम्या हाताने कुणी जायचा नाही वारकरी...

समाजाचं आपण देणं लागतो या समर्पणाच्या भावनेतून झिजणारी माणसं मृत्यूनंतर सुद्धा त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीकडे हस्तांतरित करून जिवंत राहत असतात. दिलीप लोभे यांनी आपल्या कवितेतून क्रांतीसूर्य बाबासाहेब आंबेडकर यांचे थोरपण गायिले. खुले केले चवदार तळे.. फुलविले समतेचे मळे.. अस्पृश्यतेविरूद्ध ते लढले.. महत्त्व त्यांचे हो कळे... रायगड जिल्ह्यात महाड येथे प्रसंग हा घडला.. तो दलितांसाठी लढला...

अंधारात चाचपडणाऱ्या पिढ्यांना मशिका, संघटित व्हा आणि संघर्ष कराफ हा आत्मभानाचा सुंदर मंत्र महामानवाने दिल्याची भावना लोभेंनी आपल्या कवितेतून मांडली तर कवी हणमंत पवार यांनी मतुकोबा, मला तू रित करत गेलासंफ या कवितेत तुकोबांचा वैद्दीक- चातुर्वर्ण्य व्यवस्थेविरूध्दचा लढा चिंतनाच्या पातळीवर उभा केला.निसर्ग आपणास अमर्याद देतो. हवा, पाणी ,अन्न देतो, याची जाणीव माणसांनी बाळगली पाहिजे, हा संदेश राजेंद्र माळी यांनी आपल्या मआंबाफ या कवितेतून दिला.

कधी दगडाचा मार..
कधी तोडी हावरट..
अशा तऱ्हा माणसाच्या..
आंबा पाहतो मुकाट...

हाशम पटेल यांनी आपल्या कवितेतून भूकंपाची चिरवेदना अधोरेखित केली. मपोरके होईल सारे घर, कणा हा मोडल्यावर..

प्रश्न हे सुटतील का,
गळफास घेतल्यावर...

हा प्रश्न दयानंद बिराजदार यांनी मांडला तर मपाले पडती पाले उठती, कुणी कुणाला येथे लुटतीफ ही खंत वंदना केंद्रे यांनी मांडली तर मकुणी कुणाचे झाले नाही, लटकी माया देवा, संसाराचे झाले ओझे कुठे विसावा घ्यावाफ असा सवाल सुलोचना मुळे यांनी मांडला. महरवून जातो माझा आवाज कानापर्यंत पोहोचण्याआधीफ सारखी नयन राजमाने यांची रचना अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मार्मिक भाष्य करणारी होती तर मबाप असतो घराचा चाक...माय वंगण त्या चाकाचे..ना कपडा अंगभर...ना सूर तक्रारीचेफ कवी रामदास कांबळे यांची भावस्पर्शी गेय रचना रसिकांचे डोळे पानावून गेली. घेऊन काय आला ख होतास बोल प्राण्या ।। जाणून घे कशाला श्र विश्वात मोल प्राण्या ।। विश्वास ठेव थोडा श्र नात्यांवरी स्वतःच्या ।। ठेवून बघ जराशी । हृदयात ओल प्राण्या ।।

ही सुलक्षणा सोनवणे यांची गझल नैतिकता ढासळत चाललेल्या समाजाला सणसणीत चपराक मारते. ज्ञानेश्वर हंडरगुळीकर, गोविंद काळे, वृषाली पाटील,ऋचा पत्की, विश्वंभर इंगोले,सुरेश गीर, तहसीन सय्यद,उषा भोसले ,शीला कुलकर्णी, स्वाती जोशी, देवदत्त मुंडे, नामदेव कोद्रे यांच्यासह निमंत्रित व स्थानिक कविंनी वैविध्यपूर्ण विषयावर आशयघन रचना सादर करून गांजूरचे शिवार कवितेच्या पावसाने चिंब भिजवून टाकले. कविसंमेलनाचे सूत्रसंचलन शैलजा कारंडे आणि गोविंद जाधव यांनी केले तर आभार नरसिंग इंगळे यांनी मानले. याप्रसंगी संमेलनाध्यक्ष भारत सातपुते, स्वागताध्यक्ष डॉ. कुसुमताई मोरे,डॉ. शेषराव मोहिते,प्रा. फ. म. शहाजिंदे, संयोजक डॉ. संग्राम मोरे, मसाप शाखाध्यक्ष डॉ. जयद्रथ जाधव, सचिव डॉ. दुष्यंत कटारे, डॉ. ज्ञानदेव राऊत, विवेक सौताडेकर, विलास मोरे, डॉ. संजय मोरे, भीमराव लटपटे यांच्यासह रसिक श्रोते व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# एकलव्य...।। धैर्य , दृढत्वम, समर्पणम ।।

पुस्तकाचं कुठलही पान उघडल आणि वाचण्यास सुरूवात केली तर लिखानातील सहज साध्य भाषा मनाला गुंफ़ून जाते! विशेष बाब लिखाणातील..प्रत्येक वाक्य हे चार ते पाच शब्दात संपत ; आणि आपणास हेच भावत!... हाच लेखकाचा खरा विजय आहे ...की मोजक्या शब्द-ात विषयाची मांडणी आणि केलेली लिखानाची संरचना मनाला भिडते.... एवढच नव्हे तर विचार करायला लावुन चिंतनाकडे वळवते!

एकलव्य.. सगळ्यांना एवढच माहित सर्वश्रेष्ठ धर्नुधारी, त्याची गुरूदिक्षा आणि त्याच समर्पण !

पशुपत हे त्याचे अस्स गुगलवर जरी आजच्या पिढीने वर टाकले तर पहिल्या काही टॉपर अस्सापैकी आहे हे कळत! पण एक लहान मुलगा ते एक दृढ समृध्द राज्य बनवणारा निषाधराजा ही एकलव्याची खरी ओळख लेखकांनी या पुस्तकातुन करून दिली! विचारांचां च नव्हे तर दृढ आचारांचा ..एकलव्य या पुस्तकात पाहवयास मिळतो! मला आवडलेली सर्वात मोठी गोष्ट की ह्या पुस्तकात कुठेही भिल्ल हा शब्द नसुन सार्वभौमत्व जगवर्णाऱ्या राजा हिरण्यधरूच्या राजकिय कार्यकिर्दीस अत्यंत महत्व देत निषाधर-ाजा हा गौरवशाली राजा लेखकांनी संपुर्ण ताकदीने उभारला आहे! राणी रत्नगर्भा प्रत्येक स्त्री ने अभ्यासावी ! आजची स्त्री ही स्वातंत्र्यता मिळवुन आहे असे नाही तर पुरातन काळापासुन स्त्री ही सतत श्रेष्ठ होती तिच स्वतःच स्वत्व ती जागृत ठेऊन होती हे वाचतांना लक्षात येत! राजा जर शिकारीला किंवा युध्दाला गेला तर राणी ही राज्यकर्ती असायची आणि त्यासाठी लागणारी सर्व गुण, धैर्य आणि निर्णयक्षमता तिच्यात असण हे महत्वाच असायच! कलव्यास सर्वश्रेष्ठ धनुर्धर बनायच आणि त्याला हस्तिनापुर गाठायच होत ! राणी रत्नगर्भास हे पटत नव्हत की ...मुलगा एवढ्या दुर जाऊन स्वतःच युवराजपद बाजुला ठेऊन एका आश्रमात राहुन शिक्षण घ्यावा! त्यापेक्षा उत्कृष्ट आचार्य आपण आपल्या राज्यात आणुन त्याला उत्तमातल उत्तम ज्ञान मिळवुन देऊ शकतो! पण हिरण्यधनुला एकलव्याची जिद्द आणि धर्नुविद्येची आवड लक्षात होती! मुळातच आवाजाचा वेध घेत बाण सुसाट वेगाने लक्ष्यापर्यंत गाठणारी राजा हिरण्यधनुची स्वतःची धर्नुविद्या ही एकलव्यात जन्मतः उतरली होती.

प्रजापालन ही राज्यकर्त्याची जबाबदारी आहे व प्रजेचं रक्षण करणं हा राज्यकर्त्याचा धर्म आहे.ही हिरण्यधनुची राज्यकर्त्याची सत्य संकल्पना एकलव्यात जबाबदारीसह उतरलेली आहे. गरूडपक्षाच आकाशातील उंच झेप घेत विहार करण्याच तत्व अगदी सहज शब्दात हिरण्यधनुने एकलव्यास सांगितल आणि ते गरुड पिस सतत एकलव्याने माथ्यास ठेवले!

महाभारतात जेवढे कृष्णप्रिय मोरपिस आहे तेवढेच एकलव्यास गरूडपिस आहे. कृष्णासारख सुंदर , लुभावणार देवत्व व्यक्तिमत्व नाही.. एकलव्याच!... परंतु तितकच रोमहर्षक , प्रेरक , समर्पित आणि सत्यप्रिय , दृढ महादेवाची प्रतिकृती असावी अस व्यक्तिमत्व एकलव्याच आहे . हे आपणास पुस्तक वाचतांना क्षणो क्षणी जाणवत राहत! माझ्या सारख्या वाचकास भगतसिंगावरच मृणालिनी जोशीं लिखित इन्कलाब हे पुस्तक जस वयाच्या तेराव्या वर्षी भेटल होत तस विजय देवडेंच एकलव्य वयाच्या बाराव्या वर्षी प्रत्येक मुलास भेटावं अशी मनोमन इच्छा झाली*. पुस्तकं फ़क्त विचारच नव्हे तर व्यक्तीमत्व घडवतात जीवनात काय साध्य करायचे याची योग्य दिशा घडवण्याचं काम करतात फ़क्त अशी पुस्तके आणि लेखक वयाच्या एका विशिष्ट टप्प्यावर मिळावीत..जेणेकरुन जगण्याच खरं उद्दिष्ट्य मिळुन स्वंयप्रकाशाची निर्मिती व्हायला लागते ! नित्यउपासनेच महत्व मृत्युंजयाध्ये कर्णा ने सांगितलय तसच विजय देवडेंच्या एकलव्याने जगण्यातुन दाखवुन दिलय. निसर्ग हा इतका सुंदर लेखकांनी मांडलाय की आपण त्यावर लुब्ध होतो. राजा हिरण्यधनु आणि राणी रत्नगर्भा यांच्या विचारांच मुल्य एकलव्यास सतत मार्गदर्शक ठरली. एक व्यक्तिवेध घेतांना रत्नगर्भा मधिल आई मला फ़ार भावली! आई ही आईच असते लेकरू कितीही मोठ झाल तरी आपल्या कुशीतच ते सुरक्षित राहावं ही लेकराप्रती असणारी सुरक्षित भावना अंगी असण निसर्गसुलभ मातृइच्छाच होय ..जी मी सुध्दा जगलेय!

सर्वसामान्य मुलांप्रमाणे एकलव्याची पण भरपुर प्रश्न होती आईला! प्रत्येक आईला काय हव असत देवाच्या दारात? आपल मुल हे आनंदी आणि त्याला त्याच स्वंयप्रकाशीत ऊत्कर्षक जीवन मिळाव.. हीच प्रथम मातृ सुलभ इच्छा असते! एकलव्य च्या आईतुन लेखकांनी एक अशी आई साकारली आहे जी वाचतांना प्रत्येकास आपलीच आई वाटावी..हेच लेखकाच्या लिखाना-तील वैशिष्ट्य होय.

देवीचे डोळे हे सगळ्या मंदिरातील मुर्तीत मोठेच का असतात ? ह्या प्रश्नाचे उत्तर वाचण्यासाठी नक्की वाचाव.... एकलव्य !! महादेव म्हणजे काय हे राणी रत्नगर्भेच्या संकल्पनेतुन नक्की शिकाव! ..देवा दि देव महादेव ह्या पुस्तकातुन आपल्या अंतकरणात आणखी दृढ संकल्प साकारतात आणि शक्तीरूप दर्शवतात... हे ह्या पुस्तकाचं खर सामर्थ्य!

हिरण्यधनु आणि रत्नगर्भातील प्रेमळ संवादा सोबत वैचारिक देवाण घेवाण सुध्दा खुप महत्वाची आहे जी एकलव्यावर नक्कीच प्रभाव टाकुन राहिली असावी अस वाचत असतांना सतत मनात येत!

महाराणी , खरा धर्म हा परिश्रमांना प्रोहत्साहन देणारा असावा. गादीवर लोळत पडणारा आळशी आणि भीक मागणारा भिकारी सारखेच. असा राजपुत्र दुर्सऱ्याच्या श्रमांवर जगतो आणि भिकारी दुर्सऱ्यान मिळवलेल्या गोष्टीवर भिक मागुन जगतो. दोघही आश्रित , दोघही समाजाला लागलेली वाळवीच .

......मुल्य परिश्रमाची, जगण्याची..दिशा दर्शवण्याची..योग्य अयोग्याची सांगड घालण्याची!..

कृपी चे आश्रमातील अश्वत्थामास ..सांगणे माणसाने नेहमी चांगल्या गोष्टींसाठी आभार मानायला पाहिजेत* हे सहज उद्गार चांगल्या सवयींची मुल्ये मुलांमध्ये संस्कारित करतात! निर्माता एखादी गोष्ट बनवतो पण ते आपल्यापर्यंत आणर्ण्याऱ्याचे आणि निर्मात्याचे दोघांचे आभार नक्कीच मानावेत ही सहज साध्य गोष्ट सुसंस्कृत बनवण्यास लहान वयातच मुलांसाठी उपयोगी पडतात!

अश्वत्थामा आणि एकलव्याची मित्व-ाची भावना पहिल्या भेटीपासुनच सूरू झाली आणि या भेटीतच एकलव्याचे धर्नुविद्येतील ज्ञान लक्षात येते!

अतिशय सुक्ष्म गोष्टी एकलव्याबाबतीत लेखकाने अभ्यासल्या आहेत.

..एका निषाधराजपुत्रास धर्नुविद्या कशासाठी हवी? स्वराज्याच्या संरक्षणासाठी , स्वत्वासाठी!

स्वतःच अस्तित्व हे किती अमुल्य असत हे एकलव्यास अभ्यासताना जाणवत राहत! नकळत आपण स्वत्व सांभाळायला लागतो !

लेखक विजय देवडे पुस्तकात शिकार या भागात पाचोळा, चिखल, बोचण-ारा गारवा या सगळ्यातुन दाट वनराई आणि न पोहंचणारा सुर्यप्रकाश आणि ..तिथपर्यंत पोहंचण्याचा सुर्याचा प्रयत्न आणि स्वप्न!.... इतक्या मर्मवेधक शब्दांना निसर्गाच्या जवळ नेऊन काहीतरी सुचवण...एकलव्या सोबत ..नक्कीच संरचनीय! न भूतो न भविष्यति...एकलव्याच अंगठा क्षणात देण..थरकाप उडवतो! मला स्मरण झाल कर्णाच्या कवच कुंडल दानाच! देणाऱ्याने देत जावे आणि घेणाऱ्याने घेत घेत देणाऱ्याचे हातच घ्यावेत या उक्तीप्रमाणे स्वतःची स्वप्न चकनाचूर होऊन सुध्दा परत जीवनाची उद्दिष्ट्य गाठणे म्हणजेच ..आयुष्य!. नक्कीच एकलव्य कडून शिकावे. त्याची निर्भयता, वचनबद्धता, निष्ठा आणि गुरूप्रती समर्पण...शतशः वंदनिय होय.

माणसाच्या विवेकावर मनोविकार वरचढ होतात!..साध वाक्य..पण सत्य शब्द! थोडस मला जाणवल की अर्जुनाचा किंवा भिमाचा उल्लेख करतांना त्यांना घमेंडी अथवा स्वतःचा विचार करणारे, द्वेषभावना ठेवणारे अस लिहिण्यात आल आहे.अर्जुन हा महाभारतातील कृष्णसखा होता! अर्जुन हा सगळ्यात देखणा, आकर्षक व्यक्तीमत्वाचा धनी होता. अर्जुन हा एक मोहित करणारा पुरूष होता. महाभारतातील जितकी पुस्तके मी वाचली अर्जुनास घमेंडी कधीच संबोधल गेल नाही. तीन नंबर चा भाऊ हा जसा असतो तसा तो नक्कीच होता. श्रेष्ठ धर्नुधर म्हणुन त्याची ख्याती लहानपणापासुन होती. सर्वश्रेष्ठ शिष्य व्हावे ही त्याची इच्छा कधीच नव्हती पण सर्व विद्या आपणास गुरू द्रोणांनी समर्पित करावी ही आंतरिक इच्छा नक्कीच होती. दोष गुरूचा ज्यांनी एका शिष्याकडून अंगठा घेतला गुरूदक्षिणा म्हणुन , तर दुर्सऱ्या शिष्याकडून स्वतःच्या अपमानाचा बदला म्हणुन मित्रास हरवुन समोर आणण्याची गुरूदिक्षा ! सूड हा शब्दच अघोरी आहे, जो एखाद्या साखळी प्रमाणे मानवी आयुष्य विध्वंसाकडे नेण्याचे काम करतो ! अर्जुन असो, कर्ण असो, अश्वत्थामा असो एकलव्य एकलव्य असो ...,ही ह्या सूडगाथेची बळी ठरलेली निस्पृह व्यक्तिमत्व ! पुस्तकात दुर्योधनमुखी परत द्रोणावरचा आक्षेप दुर्योधनाचा की द्रोणांनी शिकवण्यात पण भेदभाव केला! मला जेवढ वाचण्यात किंवा जाणण्यात आहे .पुर्वी जे गुरूकुल होते किंवा विद्या संकुलन होते त्यात शिष्यांना गुरू तेच ज्ञान देत ज्यात त्याची अंगभुत रूची असायची!

कौरव जन्माच्या वेळेसच गांधारीच्या मनात प्रथम पंडू पुत्र जन्मास प्रथम आले हा घाव होता ; जो तिने स्वतःच्या गर्भावर काढला! कौरवपुत्रांवर गर्भातच पांडवाबद्दलची असुया लाभलेली जी कालांतराने वाढत गेली! ही द्वेषभावना मला पुस्तकात थोडी खटकली! कारण व्यक्तीवेधात एकलव्य सर्वश्रेष्ठ आणि या धर्मज्ञानी, नितीज्ञानी, कर्मज्ञानी आर्य नसलेल्या राजपत्राबद्दल सगळ्यांच शिष्यांना सहज स्विकारणे खुप अवघड ज्याला गुरूचेसुध्दा पाठबळ नाही तो फ़क्त श्रध्देने, समर्पित भावनेने सर्वश्रेष्ठ होतो! ...हाच एक फ़रक इतरामध्ये आणि एकलव्य मध्ये !

दुर्योधनाच्या व्यक्तिमत्व-ातील अतिशय चांगल्या बाजु एकलव्यने निरिक्षल्या आहेत ज्या नक्कीच विचारयोग्य!अफ़लातुन निरिक्षण क्षमता ही एकलव्याबाबत पदोपदी मला जाणवत गेली!

भीलसेनाच एकलव्याच्या परम मित्राच महत्व खरच फ़क्त ह्याच पुस्तकात सापडेल. विशालकेतु, सुहास हे बालमित्र पण तेवढेच महत्वाचे. एकलव्याचा गेलेला अंगठा आणि घडलेली घटना भीलसेनास संताप, चीड, आणि दुःख यांचा उद्रेक म्हणजे द्रोणांच्या मुर्तीचे मुंडके छाटणे. एकलव्य मात्र शांत ! धैर्यम, दृढत्वम आणि समर्पणम..या सर्वांना साकारल त्याने. गुरूचा कणभर पण अनादर त्यास जमला नाही उलट माझ डोक जरी मागितल असत तर ते कापुन गुरूचरणांवर टाकल असत हा दृढ भाव नक्कीच काळजाचा थरकाप उडवतो...!

भीलसेन आणि एकलव्यातील शब्दा-वली भरपुर आहे. ह्या दोघातील सख्य हे विचारांच उत्कृष्ट प्रतिक आहे.गरुडझेप ..या भागात ह्या दोघातील संवाद डायरीत टिपण्यासारखे आहेत.

भीलसेनाच एक म्हणण मी स्वतः कायमच टिपुन ठेवलं ..ङ्कोणताही प्राणी आधी मनानं, मग निश्चयानं हरला तरच गुडघे टेकतो. त्यामुळे त्याला त्याच्या परिस्थितीपासुन कुणीच वाचवु शकत नाही. परंतु तुमचा निश्चय दृढ असेल, मन खंबीर असेल, तर या पृथ्वीतलावर




कुणीही तुम्हाला मात देऊ शकत नाही, हे त्रिकालाबाधित सत्य! ङ्ग

सगळ्यात मोठा गुरू .निसर्ग आहे, त्याच्यावर विश्वास दाखवा, तो तुम्हाला योग्य मार्ग दाखवेल , योग्य पद्धत शिकवेल!

अरण्याचा आनंद हा खरा क्षणांचा आनंद हे आपण भिलसेनाकडून शिकतो.

बळी...या भागात रत्नगर्भेच द्रोणाबाबतीतच , स्वतःच्या मुलाबाबतीत जो अन्याय घडला त्याबद्दलच एक वाक्य..देवा महादेवा, अशांना सुबुद्धी दे. जे माझ्या मुलासोबत घडलंय ते इतर कोणासोबत घडू देऊ नकोस वाचताच माझ्या

...डोळ्यात पाणीच तरळलं !किती स्पृहनिय व्यक्तिमत्व एकलव्याच्या या दिग्गज मातेच!

या भागाच्या शेवटच्या तीन ओळी तर खुप काही सांगुन जातात.

माणसातला ज्ञानीपणा नष्ट करणारा खुजेपणा नक्कीच कमी व्हावा असे राहुन राहुन वाटुन जाते!

एकलव्याचा महादेवावरचा विश्वास खुप भारुन टाकला मला .नकळत ह्या व्यक्तिमत्वाचे सर्व पडसाद उमटत जात आहेत माझ्यावर ! महादेव सर्वांच भलो करो .

शिशुपालाचा मृत्यु ही घटना विचार करायला लावते. अतिथी देवो भवः ही आपली संस्कृती चटका लावुन जाते. कारण मृत्यु हा यज्ञस्थानी यावा आणि तेथे रक्त सांडावे ! एकलव्याचे म्हणणे कुठेतरी विचार करायला लावते.

पशुपत ... या भागात दुर्मिळ माहिती आहे जी एकलव्याचे पशुपत हे धनुष्य समजुन घेतांना . महादेवाच पिनाक, रामाच ..कोदंड !अर्जुनाचं.... गांडिव ,परशुरामांच ...विजय

तसच पशुपतीनाथांचा आशिर्वाद असलेलं एकलव्याचं..पशुपत.

सर्व धनुष्यांची निर्मिती खुप सख-ोल अभ्यासली आहे हे लक्षात येत आणि ही अमुल्य माहिती नक्कीच वाखाजण्याजोगी आहे.

राणी असली तरी रत्नगर्भातील आई ही साध्या शब्दात लेखकाने एकलव्यच्या जीवनात क्षणोक्षणी जाणवुन दिली आहे ...आई स्वतः मला जेवायला वाढायची, हे वाक्य ..कृतज्ञ मातृस्मरण ..च्या पहिल्या ओळीतच , अवघ्या दिड पानाच्या या भागात ..विचार प्रभाव आणि अस्तित्वाचा लढा दर्शवणारी एकलव्य माता ...रत्नगर्भा खरच अंतकरणात वसते!

एकलव्य फ़क्त सर्वश्रेष्ठ धर्नुधर नसुन उत्कृष्ट आणि प्रभावी राज्यकर्ता होता . सामुहिक शेतीची संकल्पना खुप महत्वाची आहे हे लक्षात धरुन राज्य विकसित करुन समृध्द करणारा खरा राजा!

सुनीता....एकलव्य पत्नी मोहक, हुशार एकलव्याची सक्षम साथिदार मन प्रसन्न करते. राजास राणी ही सुंदरतेच प्रतिक असुन उपयोग नाही , त्या सोबत विद्वत्ता महत्वाची ! सुनीताच्या रुपात एकलव्याला एक चांगली जीवनसंगिनी लाभली. हरिण आणि काळविटाचा एक प्रसंग एकलव्य सुन-ीता च्या शिकारीच्या वेळेस लेखकांनी अफ़लातुन लिहिला...आई ही आईच असते, मग ती मानवाची असो की प्राणीमात्राची....त्यासाठी अवश्य वाचा..एकलव्यभल्लका केतुमान... ही दोन एकलव्य पु.. भल्लका लहान पण धर्नुधर तर केतुमान मोठा पण गदाध-ारी!

एकलव्य आणि पुत्रांचे विषेशतः भल्लकाचे जगणे फ़ार सुंदर. लक्ष्यवेध अप्रतिम करणारा भल्लका कायम स्मरणात! तर धनुष्य कसे बनवायचे बाण कसे तासायचे आणि धर्नुविद्या कशी जोपासायची ही एक पितारूपी गुरूतुन एकलव्याकडून भल्लका कसा म ार्गदर्शिला हे वाचण नक्कीच महत्वाच!

भल्लकासोबतचा प्रसंग आपल्या आईस राणीरत्नगर्भेस सांगु इच्छिणारा एकलव्य, तर भल्लका स्वतः उत्सुक स्वतःची माता सुन-ीतास सांगण्यास उत्सुक. कौटुंबिक भावना नाते एकलव्यात लेखक विजय देवडेंनी सहज गुंफ़ल्या आहेत! वाघ अंगावर येतांना कसे बाण गेले पाहिजेत आणि मुलाप्रतीची काळजी पित्यारूपी एकलव्यात पाहुन आपणास एक उत्तम पिता पहावयास मिळतो! प्रत्येक पित्याने वाचावे असे पुस्तक ...एकलव्य! केतुमान आणि आचार्य मधिल संवाद , प्रश्न उत्तरे विचारनिय आहेत,माणसाची वृत्ती हीच त्याची खरी शक्ती असते .

शत्रू समोर आल्यावर जशास तस उत्तर देण्यासाठी नियमित सराव करण गरजेचं आहे अशा अनेक सत्य वाक्यांचा , शब्दांचा माझ्या मनावर खुप प्रभाव पडुन मला सतत एकलव्य भावत राहिला! विषप्राशन करणारा महादेव, धरणीला स्वतःस पोटात घ्यायला लावणारी सिता, रक्तबंभाळ होत कवच कुंडलं काढून देणारा कर्ण, अंगठा कापुन गुरू दक्षिणा देणारा एकलव्य. ह्या सगळ्यांचा एकच भाव...सत्यप्रिय समर्पित भोळा भाव....स्वत्व भाव!

भल्लकास धर्नुविद्या शिकवणारा एकलव्य सांगतो प्रत्येक गोष्टीत समतोलता असावी. धर्नुविद्या किंवा कोणतीही विद्या ही सूड किंवा प्रतिशोध घेण्यासाठी नसते, तर ती विद्या प्रजेच्या संरक्षणासाठी असते.. हे बहुतेक संपुर्ण महाभारतात , फक्त एकलव्यासच ज्ञात असावे !

खांडवदहनाचे परिणाम भयंकर झाले . इथेच खरा एकलव्य पेटला. या अमानुष प्रकारात जीवांची जी धगधगती यातना होती त्याचा दाह एकलव्यास मनोमन स्पर्शुन गेला!

स्वसाम्राज्यापर्यंत शत्रु येण्यापुर्वी आपणच आक्रमण करणे ही निती ! मुळात एकलव्य धर्नुविद्या अंगभुत केलाच स्वराज्यासाठी , जनहितासाठी आणि स्वअस्तित्वासाठी!

कृष्ण नसतांना द्वारकेवर त्याने हल्ला चढवला! बलरामास भारी गेला हा धर्नुधर आणि त्याच्या संतापाचा नांगर फ़ेरू ला-गला निषाधांवर . बलरामाच्या या संतापाला निषाधच नव्हे तर यादवसेना पण घाबरली! परंतु फ़क्त सुर्यास्तामुळे बलरामास जीवनदान मिळाले! कृष्ण आणि एकलव्य जेंव्हा समोरासमोर तेंव्हा या दैदिप्यमान धर्नुधरांस आपल्यात आणावे ह्या साठी स्वतःची सर्व बुध्दी, चातुर्य, शब्द, प्रभाव, माया, आश्वासने, आणि मोक्षमार्ग.... सर्व पणा ला लावल कृष्णानं! परंतु एकलव्य..एकमेव!असा दृढनिश्चयी! नितीमत्ता जाणणारा, संकल्प पुर्ण करणारा , सदसदविवेकबुध्दी सतत स्मरणात ठेऊन ,शत्रूवर निशस्त्र असताना वार न करणारा..खरा योध्दा!

विस्मित झाला कृष्ण सुध्दा! धनुष्य हातात असेल तर याला हरवण अशक्यच हे लक्षात ठेउन कृष्णाने त्याला धनुष्यापासुन दुर ठेवले! एकलव्य ची शेवटची आठ पाने..कृष्ण आणि एकलव्य संवाद, नीती, धर्म, जगण, मरण, मोक्ष या सगळ्यापलिकडे आपणास नेऊन भावविभोर करतात! लक्षात येत की सत्य हे सत्यच असत आणि समोर प्रत्यक्षात देव जरी उभा असला तरी आपला स्वत्वा वरचा विश्वास आणि ठामपणा कमी होऊ नये!

शेवटची पाने मला किती वेळेस वाचावीत आणि समजुन घ्याव या सर्वश्रेष्ठ धर्नधराच्या मरणाला हे समजत नव्हत! स्त्रीत्वाची संकल्पना समजुन घेण्यासाठी नक्की च भेट घ्यावी मातृप्रेमी , सत्य प्रिय एकलव्याची ज्याने स्वतःची तत्वे ऐकवली सा-क्षात कृष्णाला जी स्विकारणे कृष्णास पण भाग पडले. खुप सुंदर शब्दांकन आहे दोन धर्मपाल योध्यांच..युध्दावर असताना पण ...नीती -अनिती, धर्म -शास्त्र,शत्रु -मित्र , जय-पराजय ,जन्म- मृत्यु ,अमरत्व आणि मोक्षत्वाच्या चर्चेच ! म्हणतात दोन बुध्दिवंतामध्ये तिसऱ्याने पडू नये फ़क्त त्यांचा बुध्यांक आपल्यात आत्मसात करण्याचा प्रयत्न करावा , त्यामुळेच कृष्ण एकलव्य ची वाक्ये आणि विद्वत्ता समजण्यासाठी ...एकलव्याचा शेवट सतत वाचावा! त्यातील वाक्य ही वाचकांनीच समजुन घ्यावीत! कृष्णाचे आपसुकच हात जोडले गेले ..एकलव्य या पर्वाचा अंत कधीच होणार नाही गुरूबद्दलची आस्था कधीच मावळणार नाही.

अंगठा देणारा एकच घडून गेला. दु-सरा एकलव्य उदयास येणे नाही. महादेवा, पशुपतास्त्र हे एकलव्य रुपात तुझ्याजवळ आलय!.! एकलव्यचा मृत्यु मला झंकारुन गेला! डोक्यात शिळा पडताच उच्चारला गेलेले आई शब्द वाचतांना डोळ्यातील अश्रू कधी गालांवर ओघळले लक्षा-तच आले नाही ! शेवटच्या भागात एकलव्य ला सरणावर चढवले असता भिमसेन भिल्लसेनास म्हणतो सेनापती ,पशुपत सापडत नाहीये, तेंव्हा भील-सेन अश्रु गाळत म्हणतो ..ङ्ग आता काय करायचंय त्याचं, माझा राजाच हरवलाय.हे वाचताच अंतकरणातील पिळवट ही समिश्र स्वरुपात गालांवर परत एकदा ओघळली! स्तब्ध झाली मी , लक्षातच आले नाही की मी पुस्तक वाचतेय... सत्य जगात पुस्तकातुन बाहेर यायला वेळ लागला!परत एकदा वळुन एकलव्यास परत -परत वाचाव वाटल , त्याचं जगण देवत्वाच्या सीमा ओलांडून ध्येयाचा उचित मार्ग दर्शवत .....स्वत्वाच अस्तित्व तय्यार कस होत हे कायम लक्षात राहिल!

**अर्चना पैके**
**उदगीर.**
**९४२०४३५०८१**

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २२४/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Sharfoddin Pashumiya Mujawar हे दिनांक १२.०२.२०२४ रोजी R/o Shekapur, Tq. Udgir, Dist.Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार Maheboob Shardoddin Mujawar, Age 47, Occu. Farmer. Applicant R/o. Shekapur, Tq.Udgir Dist.Latur

यांनी खालील नमूद ६ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Farjanabegam Mohammad Hanif | 50 | Daughter |
| 2) | Rijwana Munnamiya Shaikh | 49 | Daugther |
| 3) | Gaushiyabi Khamarpasha Shaikh | 41 | Daughter |
| 4) | Shabana Rajjak Shaikh | 42 | Daughter |
| 5) | Rihanabi Mustafa Shaikh | 40 | Daughter |
| 6) | Meheboob Sharfoddin Mujawar | 47 | Son |

अर्जदार याने Sharfoddin Pashumiya Mujawar या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Sharfoddin Pashumiya Mujawar यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः १९/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः २५/०४/२०२४

आदेशावरुन

(ए.बी.सुर्यवंशी) (एस.एम.शेटे)
कनिष्ठ लिपिक सहा.अधिक्षक,
४ थे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.एन.जे. चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २३५/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Paryabgai W/o. Shakarrao Kankatte हे दिनांक १७.०२.२०२४ रोजी At. Nagalgaon, Tq.Udgir येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Chandrakant s/o. Shinkarrao Kankatte, Age 65, Occu- Agri. R/o. Nagalgaon, Tq.Udgir Dist.Latur

यांनी खालील नमूद हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Chandrakant s/o. Shankarrao Kankatte | 65 | Son |
| 2) | Vilas S/o Shankarrao Kankatte | 60 | Son |
| 3) | Ravmmabai W/o. Digambar Dadge | 68 | Daughter |

अर्जदार याने Paryabgai W/o. Shakarrao Kankatte या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Paryabgai W/o. Shakarrao Kankatte यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः १९/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः ०३/०६/२०२४

आदेशावरुन

(एस.बी. शेगेदार ) (एस.एम.शेटे)
कनिष्ठ लिपिक सहा.अधिक्षक,
३ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि दि.१०/०४/२०२४

ज्याअर्थी अर्जदार शेख आमेना बेगम महेबुब मियॉ रा. जी.ए. फंक्शन हॉल किल्ला रोड उदगीर ता.उदगीर येथे त्यांच्या जन्म दिनांक २०/०७/१९७७ रोजी झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार शेख आमेना बेगम महेबुब मियॉ रा. जी.ए. फंक्शन हॉल किल्ला रोड उदगीर ता.उदगीर येथे त्यांच्या जन्म दिनांक २०/०७/१९७७ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २०/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक २०/०७/१९७७ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय अर्जदार शेख आमेना बेगम महेबुब मियॉ रा. जी.ए. फंक्शन हॉल किल्ला रोड उदगीर ता.उदगीर येथे त्यांच्या जन्म दिनांक २०/०७/१९७७ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १०/०४/२०२४ रोजी दिले पूढे नेमलेली तारीख ११/०५/२०२४

Sd/-
तालूका दंडाधिकार तथा
तहसीलदार उदगीर

## जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि दि.१०/०४/२०२४


ज्याअर्थी अर्जदार सोहेल अख्तर तहसीन शेख रा. चर्च रोड उदगीर ता.उदगीर यांचा जन्म मौजे उदगीर ता.उदगीर येथे त्यांच्या जन्म दिनांक ०२/०५/१९८८ रोजी झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार सोहेल अख्तर तहसीन शेख रा. चर्च रोड उदगीर ता.उदगीर यांचा जन्म मौजे उदगीर ता.उदगीर येथे त्यांच्या जन्म दिनांक ०२/०५/१९८८ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २०/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०२/०५/१९८८ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय अर्जदार सोहेल अख्तर तह-सीन शेख रा. चर्च रोड उदगीर ता.उदगीर यांचा जन्म मौजे उदगीर ता.उदगीर येथे त्यांच्या जन्म दिनांक ०२/०५/१९८८ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १०/०४/२०२४ रोजी दिले पूढे नेमलेली तारीख ११/०५/२०२४

Sd/-
तालूका दंडाधिकार तथा
तहसीलदार उदगीर




उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ; डॉ.अंकिता लाहोटी (DOMS); डॉ. दिपाली पाटील (MS); डॉ. शितल पेद्देवाड (M.S.); डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष; व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर; लॉ. प्रदिप बेद्रे सचिव





## येरगी येथे स्वच्छ्ता अभियान व शैक्षणिक साहित्य वाटप करून साजरी केली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती साजरी

देगलूर(प्रतिनिधि): तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यानिमित्त सकाळी ७ ते १० दरम्यान गावातील युवक, युवती आणि नागरिकांनी स्वच्छता अभियान राबविले.यामध्ये सर्वांनी मिळून गावातील रस्ते झाडून स्वच्छ केले आणि नाल्या स्वच्छ केल्या.

त्यानंतर गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यात प्रथम बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा लेखाजोखा मांडला. गावातील कोणतेही मुल शिक्षणापासून वंचित राहणार नाही असा निर्धार केला. यावेळी भाजपा जिल्हाउपाध्यक्ष तथा संजय गांधी निराधार अध्यक्ष संतोष पाटील यांच्याकडून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,पोलिस पाटील, गावातील प्रतिष्ठित नागरीक आजी, माजी, सरपंच, तटा मुक्ती अध्यक्ष, पदाधिकारी,विद्यार्थ्यांना बाबासाहेबांचा आदर्श घेऊन अभ्यास करून जीवनात यश मिळवावे असे आवाहन केले.

या प्रसंगी बालिक पंचायत राज सदस्य, येरगीचे पदाधिकारी आणि सर्व सदस्य, जयंती समीतीचे सर्व सदस्य उपस्थितीत होते.

## पंचमुखी हनुमान मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताह

लातूर / प्रतिनिधी- येथील ज्ञानेश्र्वर नगर भागामध्ये असलेल्या पंचमुखी हनुमान मंदिरामध्ये, १६ एप्रिल ते २३ एप्रिल हनुमान जन्मोत्सवा पर्यंत, अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्र्वरी पारायण, यासह विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहाच्या निमित्ताने मोहन महाराज हिप्परगे, सुभाष महाराज आळंदीकर, संजयानंद महाराज ज्ञानपुरे करमाळा, नंदू महाराज हरंगुळ, बाबा महाराज काटगावकर, आप्पासाहेब महाराज दिवेगावकर, नवनाथ महाराज गोसावी डोंगर शेळकी, यांचे कीर्तन तर बालाजी काळे लोदगेकर, राम कृष्णाचार्य हालगरकर, विलास महाराज बोंडगे माळकोंडजी, वैजनाथ महाराज सुरवसे सुगावकर, ज्ञानोबा माऊली महाराज मळवटी, जगदीश मालू तळणीकर, गणपतराव बाजुळगे तांबरवाडीकर यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात एम.कॉम द्वितीय वर्ष विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न



लातूर: येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात एम.कॉम द्वितीय वर्ष विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला.

महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा निरोप समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्रचार्य डॉ. गणेश लहाने, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बालाजी कांबळे, डॉ. ब्रिजमोहन दायमा, डॉ. बाळासाहेब चव्हाण, डॉ. बी.जी. खटाळ, डॉ. आकांक्षा भांजी, डॉ. प्रिया वर्मा, प्रा. अक्षय पवार उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून महाविद्यालय तसेच प्राध्यापकांबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त केली.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने म्हणाले की, विद्यार्थ्यांनी संकटांना घाबरून न जाता आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक संकटावर मात करून यश मिळवले पाहिजे. महाविद्यालय आज पर्यंत आपल्या सोबत होतेच पण यानंतरही आपल्या सोबतच असेल यात कुठलीच शंका नाही, असा आशावाद ही व्यक्त केला.कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती मातेच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. बाळासाहेब चव्हाण यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. अक्षय पवार यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व एम. कॉम द्वितीय वर्गाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भीमराव क्षीरसागर, नरसिंग काळे, ऋषीकेश कांबळे आदींनी परिश्रम घेतले.

## निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उमेदवारांचे शपथ पत्र पाहण्यास उपलब्ध

धाराशिव (प्रतिनिधी) - लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने दि.१६ मार्च रोजी घोषित केला आहे. तिसऱ्या टप्प्यात ४० - उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघासाठी दि. ७ मे रोजी मतदान होणार आहे. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची प्रक्रिया दि.१२ एप्रिलपासून सुरु झाली असून १८ एप्रिल हा नामांकन पत्रे दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. तर उमेदवाराने दाखल केलेले शपथ पत्र व प्रतिशपथ पत्र नागरिकांना पाहण्यासाठी उपलब्ध राहणार आहे.

उमेदवारांचे नामनिर्देशन पत्रासोबत दाखल होणारे शपथ पत्र व प्रतिशपथ पत्र जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच भारत निवडणूक आयोगाच्या https://affidavit.eci.gov.in या संकेतस्थळावर नागरीकांना पाहण्यास उपलब्ध राहणार असल्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ सचिन ओंबासे यांनी सांगितले.

## १५० निराधारांना संतोष पाटील यांचा आधार

### स्वतः थांबून १५० निराधारांना काढून दिले हयात व उत्पन्नाचे प्रमाणपत्र



देगलूर(प्रतिनीधी) : संजय गांधी निराधार अनुदान योजना साठी निराधार महिला पुरुष नागरिकांना तलाठी कडून हयात प्रमाणपत्र आणि उत्पन्नाचे प्रमाणपत्र ही कागदपत्रे योजनेचा लाभ घेण्यासाठी द्यावी लागतात. परंतु काही कारणामुळे सदरील जवळपास १५० नागरिकांना हि कागदपत्रे मिळत नव्हती. या संदर्भात सर्व निराधार लोकांनी संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती चे अध्यक्ष संतोष पाटील यांच्या कडे ही अडचण मांडली असता आज संतोष पाटील यांनी स्वतः तहसीलदार राजाभाऊ कदम यांच्याशी चर्चा करून योग्य व्यक्तींना तात्काळ हयात व उत्पन्नाचे प्रमाणपत्र देण्याची विनंती केली. त्यानंतर स्वतः तलाठी कार्यालयासमोर थांबून जवळपास १५० निराधार महिला पुरुषांना हयात प्रमाणपत्र व उत्पन्नाचे प्रमाणपत्र मिळवून दिले.

संतोष पाटील यांच्या आजच्या या कृतीने पहिल्यांदाच स्वतः संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती चे अध्यक्ष संतोष पाटील यांनी कागदपत्रे मिळवून देऊन खऱ्या अर्थाने निराधारांची सेवा केली. तसेच सर्व उपस्थित निराधार महिला पुरुषांना चहा पाण्याची व्यवस्था केली. त्यांच्या या कार्याबद्दल आज सर्व उपस्थित निराधारांनी संतोष पाटील यांचे सहृदय अभिनंदन करून आभार मानले. संतोष पाटील यांनी आज केलेल्या कार्याची सगळीकडे कौतुक होत आहे.

## निवडणूक खर्च निरीक्षक संजीव बॅनर्जी यांनी केली विविध स्थिर निगराणी पथकांची पाहणी

लातूर, / प्रतिनिधी- भारत निवडणूक आयोगाने लातूर लोकसभा मतदारसंघासाठी नियुक्त केलेले निवडणूक खर्च निरीक्षक संजीव बॅनर्जी यांनी अहमदपूर, निलंगा, उदगीर आणि लातूर विधानसभा क्षेत्रातील स्थिर निगराणी पथकांना (एसएसटी) भेट देवून तेथील कामकाजाचा आढावा घेतला. तसेच उदगीर आणि निलंगा येत्थील सहायक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात निवडणूक खर्च विषयक पथकांची आढावा बैठक घेवून प्रत्येकाने आपापली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडण्याच्या सूचना दिल्या.

निलंगा येथील बैठकीला उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी शरद झाडके, जिल्हा परिषदेचे अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, निलंगाचे तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, देवणीचे तहसीलदार गजानन शिंदे, शिरूर अनंतपाळचे तहसीलदार श्री.पेदेवाड, निलंगाचे गटविकास अधिकारी सोपान अकीले, गट विकास अधिकारी संतोष माने, नायब तहसीलदार सुधिर बिराजदार आदी उपस्थित होते.

निवडणूक खर्च संनियंत्रणासाठी गठीत करण्यात आलेल्या सर्व पथकांनी उमेदवारांच्या दैनंदिन खर्चाचे लेखे अद्ययावत ठेवावेत. तसेच भारत निवडणूक आयोग, जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त सूचनांप्रमाणे सर्व पथक प्रमुखांनी समन्वय ठेवून काम करावे. सी-व्हीजील ॲपवर प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा निपटारा विहित वेळेत करावा. राजकीय पक्ष, उमेदवारांनी सादर केलेला खर्च आणि विविध पथकांकडून आलेल्या खर्चाची पडताळणी करून नियमानुसार कार्यवाही करावी, असे श्री. बॅनर्जी म्हणाले. स्टार प्रचारकाबाबत विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करावी. स्थिर निगराणी पथके, भरारी पथके, व्हिडीओ निगराणी पथकांनी दक्ष राहून आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी, असे त्यांनी सांगितले.

उदगीर सहायक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात आढावा

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी उदगीर विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात निवडणूक खर्चाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी निवडणूक खर्च निरीक्षक संजीब बॅनर्जी यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, जिल्हा परिषदेचे अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, उदगीरचे तहसीलदार राम बोरगावकर, गट विकास अधिकारी संतोष माने यावेळी उपस्थित होते. कर्नाटक सीमा भागात असलेल्या स्थिर निगराणी पथकांनी अधिक सतर्क राहून काम करावे. तसेच याठिकाणी राज्य उत्पादन शुल्क आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांचीही नियुक्ती करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

पान १ वरून

### मराठी म्हणीचा...

परिस्थिती बिकट झाली आहे. काँग्रेस आघाडीच्या कामकाजासाठी मराठीत एक म्हण आहे, ङबारशाला गेला आणि बाराव्याला आलाफ असे म्हणत मोदी यांनी काँग्रेस आणि इंडिया आघाडीवर घाणाघात केला. यापूर्वी नागपूरच्या पहिल्या सभेतही पंतप्रधान यांनी मराठी म्हणीचा उल्लेख केला होता. त्यावेळी, पाण्यावर काठी मारल्यानंतर पाणी दुभंगत नाही, असे म्हटले होते. आता, पुन्हा एकदा मराठी म्हणीतून काँग्रेसवर हल्लाबोल केला.

दरम्यान, यावेळी राज्यातील महायुती सरकार महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी आणि विविध योजनांसाठी काम करत आहे. सिंचन योजना, दळणवळण यांसह अनेक क्षेत्रात महाराष्ट्रात मोठं काम होत असल्याचंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

### अमित शहा...

पोकळी भरण्यासाठी जनतेने आम्हाला १० वर्षे दिली, आता पुढील ५ वर्षात विकसित भारताचा पाया घालायचा आहे. मी देशातील मतदारांना आवाहन करतो की, प्रचंड बहुमताने सर्वत्र कमळ फुलवा. गांधीनगर लोकसभा जागेसाठी ७ मे रोजी मतदान होत आहे.

अमित शाह यांचा रोड शो आणि रॅली

अमित शाह गांधीनगरमध्ये तीन रोड शो आणि रॅलीला संबोधित करणार आहेत. पहिला रोड शो अहमदाबाद जिल्ह्यातील सानंद शहरात तर दुसरा गांधीनगर जिल्ह्यातील कलोल शहरात होणार आहे. यानंतर अहमदाबाद शहरात तिसरा रोड शो होईल. रोड शो केल्यानंतर शाह अहमदाबाद शहरातील वेजलपूर भागात निवडणूक रॅलीला संबोधित करतील.

### पहिल्यांदाच...

असेल. बद्रिनाथ-केदारनाथ मंदिर समितीचे मुख्य कार्यकारी योगेंद्र सिंह यांच्या म्हणण्यानुसार ऑनलाईन पूजा यंदा ३० जूनपर्यंतच होईल. त्यात श्रीमदभागवत वाचनासाठी ५१हजार रुपये तर महाभिषेकासाठी १२ हजार रुपये ठरले आहेत. सर्वात कमी देणगी २०१ रुपये कर्पूर आरतीसाठी आहे.

केदारनाथ हिम धाम

चारही धाम ३ हजार मीटरपेक्षाही उंच आहेत. डोंगरावर बर्फवृष्टी होत आहे. भाविकांनी ७ दिवसांचे नियोजन करूनच बाहेर पडावे.केदारनाथ धाममध्ये अद्यापही २ ते ३ फूट बर्फाचा थर आहे.गौरीकुंडापासून धामपर्यंत १६ किमीचा मार्ग बर्फाने आच्छादलेला आहे. १० मेपासून यात्रा सुरू होणार आहे. म्हणून एसडीआरएफने बर्फ हटवण्यास सुरुवात केली. उर्वरित तीन धामचे रस्ते खुले आहेत. हवामान विभाग केंद्राचे संचालक ब्रिकम सिंह म्हणाले, धाम भागातील बर्फवृष्टी मेच्या पहिल्या आठवड्यापर्यंत चालेल. १५ मेनंतरच हवामान सामान्य राहील.

### राज्यात...

टक्केवारी पुढीलप्रमाणे -

रामटेक ५२.३८ टक्के, नागपूर ४७.९१ टक्के, भंडारा- गोंदिया ५६.८७ टक्के, गडचिरोली-चिमूर ६४.९५ टक्के, आणि चंद्रपूर ५५.११ टक्के.

### लोकसभेसाठी...

लागेल असे सांगितलं. चंद्रशेखर बावनकुळे सुद्धा सेम बोलले. त्यानंतर ३ आठवडे गेले मात्र अजुनही उमेदवार जाहीर झालेले नाहीत, अशी माहिती छगन भुजबळ यांनी दिली.

मी या निवडणुकीतून माघार घेतली

छगन भुजबळ म्हणाले, महाविकास आघाडीचे उमेदवार त्या ठिकाणी मागील ३ आठवड्यांपासून फिरत आहे. त्यांचा प्रचार देखील पुढे गेला आहे. जेवढा निर्णय घ्यायला वेळ लागेल तेवढ्या अडचणी वाढणार आहेत. सध्या जो काही संभ्रम निर्माण झाला आहे तो दूर करण्यासाठी मी प्रेस घेतली. मी या निवडणुकीतून माघार घेतली आहे. मी राज्यभरात प्रचाराला सुरूवात केली आहे. मी आता महायुतीची शक्ती वाढवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. मला आत्तापर्यंत ज्यांनी पाठिंबा दिला त्यांचा आभारी आहे. मोदी साहेबांनी माझ्यावर विश्र्वास ठेवला त्याबद्दल त्यांचे आभार, असे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे.

### महाविकास आघाडीचे...

आदमी, समाजवादी या व सर्व घटक पक्षाचे कार्यकर्ते पक्षाचे झेडे घेऊन सहभागी झाले. त्यामुळे विविधतेतून एकतेचे दर्शन घडविणारे चित्र लातूरमध्ये दिसून येत होते.

महापुरूषांच्या पुतळयास अभिवादन महाविकास आघाडी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मिरवणूक गंजगोलाई येथून निघाल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर येथ पर्यंत असलेल्या महापुरूषाच्या पुतळयांना डॉ. शिवाजी काळगे, माजी मंत्री आमदार अमित देशमुख व मान्यवर नेत्यांनी पुषपहार अर्पन करून अभिवादन केले. महात्मा गांधी चौकात महात्मा गांधी, महात्मा ज्योतीबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आधुनीक महाराट्राचे शिल्पकार माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पन करून अभिवादन करण्यात आले. मिरवणुकीवर ठिकठीकाणी पुष्पवृष्टी महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार डॉ.शिवाजी काळगे उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी गंजगोलाई येथे जगदंबा मातेचे दर्शन घेऊन ऐतिहासीक मिरवणुकीने निघाले तेव्हा मिरवणुकी दरम्यान ठिकठिकाणी त्यांच्या रथावर नागरीक, व्यापारी, विविध संघटनाचे प्रतिनिधी पुष्ववृष्टी करून त्यांना शुभेच्छा देण्यात येत होत्या. मिरवणुकीत सहभागी झालेल्या लोकांची संख्या वरचेवर वाढत गेल्याने एकूण मिरवणुकीतील उत्साह वाढतच गेला. लोकसभा निवडणुकीचा अर्ज दाखल करण्यापूर्वी बाभळगाव येथे लोकप्रिय नेते, माजी पालकमंत्री अमित विलासराव देशमुख साहेब, आमदार धिरज देशमुख, काँग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या समाधीस्थळी विनम्रपणे पुष्पांजली अर्पण केली.

### मोदी सरकारच्या ...

म्हणून काम केले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना ना. बनसोडे म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला घटना दिली. बाबासाहेबांचे संसदेत तैलचित्र लावण्यासाठी काँग्रेसला तब्बल पन्नास वर्षे लागली. काँग्रेस आज अपप्रचार करत आहे. घटना बदलणार हे खोटे सांगत आहे. या पृथ्वीतलावर चंद्र सूर्य असेपर्यंत बाबासाहेबांची घटना कोणी बदलणार नाही,असेही त्यांनी सांगितले.

## नितीन गडकरींनी नागपुरात केले मतदान

नागपूर : जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असलेल्या भारतात आज लोकशाहीच्या सर्वात मोठ्या उत्सवाला सुरुवात झाली. शुक्रवारी सकाळी ७ वाजेपासून लोकसभा निवडणुकच्या पहिल्या टप्प्यातील मतदानाला सुरुवात झाली असून २१ देशातील १०२ मतदारसंघात मतदान होत आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील ५ लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. यात रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूर या मतदारसंघांचा समावेश आहे.

दरम्यान, आज या पाच लोकसभा मतदारसंघातील विविध नेते आपल्या मतदानाचा हक्का बजवताना दिसत आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीदेखील आज नागपुरात आपल्या मतदानाचा हक्क बजावला. यावेळी त्यांनी मोठ्या फरकाने विजयी होण्याचा विश्र्वास व्यक्त केला. यावेळी ते म्हणाले, आज आपण देशातील लोकशाहीचा सर्वात मोठा सण साजरा करत आहोत. मतदान हा प्रत्येकाचा मुलभूत हक्क आणि कर्तव्य आहे, त्यामुळे प्रत्येकाने मतदान करावे. गेल्या वेळी ५४ टक्के मतदान झाले होते, यावेळी मतदानाची टक्केवारी ७५ टक्क्यांवर नेण्याचा आमचा संकल्प आहे. तुम्ही कोणालाही मत देऊ शकता पण मतदान करणे महत्त्वाचे आहे. मला १०१% विश्र्वास आहे की, मोठ्या फरकाने जिंकेन. दरम्यान, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीदेखील आज मतदानाचा हक्क बजावला. त्यांनी कोराडी ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन मतदान केले.

## राम मंदिरात सितेची मूर्ती असावी

पुणे : पंतप्रधान नरेंद्र मोदी, सरसंघचालक मोहन भागवत आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ या तिघांच्या उपस्थितीत तसंच साधू-संतांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. त्यातच परवा अयोध्येतल्या मंदिरात रामनवमी साजरी झाली आणि सूर्यतिलक सोहळाही पार पडला. दरम्यान, आता राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी नवीन सवाल करत भाजपवर हल्लाबोल केला आहे. रामाच्या मंदिरात सीतेची मूर्ती का नाही? असा सवाल शरद पवारांनी उपस्थित केला. याविषयी बोलताना शरद पवार यांनी एका मिटिंगमध्ये माझ्यापुढे विषय निघाला त्यात महिलांनी अशी तक्रार केली की रामाचे सगळे बोलत आहात मग सीतेची मूर्ती का बसवत नाही? मी महाराष्ट्रात फिरतो आहे. मला अनुकूल चित्र दिसत आहे. राम मंदिर होऊन गेलं आता त्याविषयी लोकांमध्ये चर्चा नाही. तसंच या सरकारविषयी नाराजी आहे असे शरद पवार म्हणाले. शरद पवारांना राम मंदिराचा मुद्दा महत्त्वाचा ठरेल का? हा प्रश्न विचारला होता. त्यावर त्यांनी हे उत्तर दिले आहे.

### जाहीर प्रगटन

विशेषतः मौजे गातेगाव ता. जि. लातूर येथील सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यास येते की, अर्चना नितीन सूर्यवंशी यांनी त्याच्या मे. समर्थ ड्रेसरीज या व्यवसायसाठी त्यांनी रक्कम रुपये १५,००,०००/-(पंधरा लाख) रु. इतके कर्ज इंदिरा महिला नागरी सहकारी बँक लिमिटेड शाखा लातूर यांच्याकडे मागणी केली आहे व ती मंजूर करून संबंधित बँकेने सदर कर्जासाठी मंजूरी दिली आहे सदर कर्जास त्याची व ओम नितीन सूर्यवंशी यांची सामाईक मालकीची मौजे गातेगाव ता. जि. लातूर येथील शेत जमीन गट नं १२७/१ मधील २ हे ६३ आर व १२८/१ मधील० हे ५० आर आहे याची चतुः सिम खालीलप्रमाणे आहेत :-

गट नं १२७/१

**पूर्वेस :** अंगद बनसोडे यांची जमीन.

**पश्चिमेस**: पाझर तलाव

**दाक्षिणेस**: सांडवा

**उत्तरेस :** मोरे यांची जमीन.

गट नं १२८/१

**पूर्वेस :** बाहेती यांची जमीन.

**पश्चिमेस**: अंगद बनसोडे यांची जमीन.

**दाक्षिणेस**: अंगद बनसोडे यांची जमीन.

**उत्तरेस :** बाहेती यांची जमीन.

वरील मिळकत बँकेस गहानखत करून देणार आहेत तरी सदर कर्जासाठी तारण म्हणून करण्यात येणाऱ्या वरील मिळकतिच्या गहाणखातस जर कोणाचा काही उजर, आक्षेप वा हरकत किंवा बक्षीस पत्र खरेदीखत कर्जबोजा, कोणत्याही कोर्टातील वाद किंवा दावा प्रलंबीत असेल व सदर मिळकत हस्तांतरणाबाबत कुटलाही करार, ठराव किंवा व्यवहार ठरला असेल किंवा झाला असेल तर सदर जाहीर प्रगटण प्रसिद्ध झाले पासून ४ दिवसाच्या मुदतीत आपण आपले उजर व आक्षेप जाहीर प्रगटण देणार यांच्या कार्यालयात लेखी स्वरुपात नोंदवावे व त्यांची रीतसर पोहंच घ्यावी अन्यथा सदर मिळकत निरंक निर्वेद्ध समजण्यात येईल मुदतीनंतर येणारा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही ह्याची कृपया नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटण

दि : १६/०४/२०२४

तर्फे

**अँड. कल्पना. एम. भुरे**
**पार्वती निवास बसवेश्वर**
**कॉलनी ब्लॉक नं.२३**
**लातूर ९८२२८८७७४५**

**जाहीर प्रगटण देणार**
**इंदिरा महिला नागरी**
**बँक शाखा लातूर**

### नावात बदल

मी राजेश वैकुंठराव मद्रेवार असे जाहीर निवेदन करतो की, पूर्वा माझे नाव RAJESH ALIAS RAJU VAIKUNTHRAO MADREWAR असे होते. माझ्या मुलीच्या पासपोर्टवर पणा असेच आहे. ते मी बदलून माझे नाव माझ्या सर्व कागदपत्रावर RAJESH VAIKUNTHRAO MADREWAR असे केले आहे० तरी यापुढे माझ्या मुलीच्या पासपोर्टवर माझे नाव RAJESH VAIKUNTHRAO MADREWAR असे राहिल व माझ्या पूर्ण फॅमीलीच्या नावापुढे माझे नाव हेच राहिल.

**NEW NAME**
RAJESH VAIKUNTHRAO MADREWAR
**OLD NAME**
RAJESH ALIAS RAJU VAIKUNTHRAO MADREWAR


## कल्याण बाजार

### गोल्डन विकली चान्सेस

मिलन (उदय/अस्त)(शनिवार) २०.०४.२४

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११८ | ७ | १६० | ० | १४५ |
| १२७ | | २६९ | | २३५ |
| ०५-५० | ७६-६७ | | ८०-०४ | |

### नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५९ | २८९ |
| १७७ | | २७० |
| ५२-२५ | | ९८-८९ |

जबरदस्त चान्ससाठी

**संपर्क करा**

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारी आहे. कृपया दुरुपयोग करु नये.

मोबा-९८९८२०३८८८


### टि.सी. हरवली आहे

माझी पूजा अंकुश कांबळे या नावाची ९ वी पासची टि.सी. उदगीर ते लातूर बसने प्रवास करीत असताना हरवली आहे. जर कोणास सापडल्यास खालील मोबाईवर संपर्क साधावा.

मो.नं. ९३७०६८५५५१



# यशवंत

शनिवार दिनांक २० एप्रिल २०२४

## उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com

**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग

# शोषण करणाऱ्या श्रद्धा म्हणजेच अंधश्रद्धा होय - मा.माधव बावगे




**उदगीर (प्रतिनिधी)** आमचा श्रद्धेला विरोध नाही, श्रद्धा ही विज्ञानाच्या कसोटीवर टिकणारी हवी. जी श्रद्धा तपासायला तयार असते तिचा आम्ही आदर करतो. पण लोक श्रद्धेची चिकित्सा करत नाहीत श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धाच जोपासत असतात. त्यांना वाटते अंधश्रद्धा म्हणजे श्रद्धेच्या निखाऱ्यावरची राख. राख उडवून लावताना निखारा विझायला नको. याची काळजी घेतली पाहिजे. एकंदरीत प्रत्येकाने आपल्या श्रद्धा तपासल्या पाहिजेत. जेणे करून शोषण होणार नाही. असे विचार मा.माधव बावगे यांनी व्यक्त केले.

चला कवितेच्या बनात, उदगीर आयोजित वाचक संवादाचे ३११ वे पुष्प माजी ग्रंथपाल बाबुराव माशाळकर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष,मा.माधव बावगे यांनी डॉ. नरेंद्र दाभोळकर लिखित श्रद्धा- अंधश्रद्धा या साहित्यकृतीवर बोलताना, चला कवितेच्या बनात या वैचारिक सातत्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक करून म्हणाले की, अंनिसची चळवळ देवधर्म बुडविणारी नाही. या चळवळीविषयी धर्मांध सनातनी लोकांनी खूप गैरसमज पसरविले आहेत. भितीतून, अज्ञान, अगतिकतेतून अंधश्रद्धेचा जन्म होत असतो. माणूस भावनेच्या आहारी जाता कामा नये. भावना आणि विचार याचे पारडे समान असायला हवे. श्रद्धा ही माणसाचा मूल्यविवेक उन्नत करते. दाभोळकर नेहमी सांगायचे की, अंधश्रद्धा या विकासाच्या विरोधी असतात. एकंदरीत श्रद्धेच्या माध्यमातून समाजाची दिशाभूल व्हायला नको. असे सांगत त्यांनी स्वतःचे अनुभव वाचकांसमोर ठेवून वस्तुस्थितीवर भाष्य करीत श्रोत्यांना अंतर्मुख केले. शेवटी श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरेही दिली.

अध्यक्षीय समारोपात ग्रंथपाल बाबुराव माशाळकर म्हणाले, ज्ञान संवर्धनाच्या दृष्टीने वाचक संवाद हा उत्कृष्ट उपक्रम आहे. समाज परिवर्तनासाठी अशा उपक्रमाची गरज आहे. समाजातील अंधश्रद्धेला मानसिक दुर्बलता, अगतिकता कारणीभूत असते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविंद सावरगावे यांनी केले, संवादकांचा परिचय डॉ.म.ई.तंगावार यांनी करून दिला तर आभार तुळशीदास बिरादार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाचक संवादाचे संयोजक अनंत कदम, प्रा.राजपाल पाटील, आनंद बिरादार, मुरलीधर जाधव इत्यादींनी प्रयत्न केले. सदरील कार्यक्रमास शहरातील वाचक रसिकश्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एन.एम.एम.एस. परीक्षेत लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयाचे उत्तुंग यश

## चार विद्यार्थी राष्ट्रीय शिष्यवृत्तीसाठी पात्र




**उदगीर (प्रतिनिधी)** लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठी घेण्यात येणाऱ्या स्पर्धा (छचचड) परीक्षेत उत्तुंग यश मिळविले आहे.या परीक्षेचा अंतिम निकाल १२ एप्रिल २०२४ रोजी जाहिर झाला असून या परीक्षेसाठी विद्यालयातील एकुण ८५ विद्यार्थ्यांनी आवेदन पत्र भरले होते.त्यापैकी ४७ विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले असून त्यापैकी ०४ विद्यार्थी शिष्यवृत्ती साठी पात्र ठरले आहेत.यामध्ये कु.श्वेता शिवाजी बिरादार १४१, कु. आर्या राजेश वासुदेवणे ११७, कु. गायत्री धनंजय भोसले ११५, चि.पियूष सतीश लाडवते १०९, हे विद्यार्थी राष्ट्रीय शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांना एन एम एम एस परीक्षा प्रमुख दिलीप पाटील व राहुल नेटके यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा लालबहादूर शास्त्री शिक्षण संकुलाचे कार्यवाह शंकरराव लासुणे,अध्यक्ष मधुकरराव वटमवार,शालेय समिती अध्यक्ष सत्नप्पा हुरदळे, मुख्याध्यापक अंबादास गायकवाड ,उपमुख्याध्यापक संजय कुलकर्णी,पर्यवेक्षक कृष्णा मारावार, श्रीपत सन्मुखे, माधव मठवाले तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले. तसेच पालक व यशस्वी विद्यार्थ्यांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# व्यंकटराव पाटील यांचे निधन



**देवणी (प्रतिनिधी)** देवणी तालुक्यातील मौजे होनाळी येथील माजी पोलीस पाटील व सेवानिवृत्त शिक्षक आणि लोक जागृती शिक्षण संस्था संचालक व्यंकटराव माधवराव पाटील वय ८२ वर्ष यांचे वृद्धापकाळाने १८ एप्रिल गुरुवारी मध्यरात्री निधन झाले.

त्यांच्यावर आज शुक्रवारी मौजे होनाळी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शैक्षणिक सामाजिक राजकीय स्तरातील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते.

त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा तीन मुली सुना व नातवंडे असा परिवार आहे. चेअरमन प्राध्यापक अनिल पाटील यांचे ते वडील होत.

# उदगीर स्त्रीरोग संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. सविता पदातुरे ; सचिवपदी डॉ.प्राजक्ता गुरुडे

**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर स्त्रीरोग संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ.सविता पदातुरे यांची तर सचिव पदी प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. प्राजक्ता गुरूडे यांची निवड करण्यात आली आहे.

नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा रविवारी उदयगिरी लॉयन्स येथे पार पडला. उदगीर स्त्रीरोग संघटनेच्या टीचे चेअरमन डॉ.रचना जाजू यांनी पदग्रहण सोहळ्याची शपथ दिली. यावेळी आय.एम.ए.चे अध्यक्ष डॉ.बाळासाहेब पाटील, आ.ए.पी.चे अध्यक्ष डॉ. जयंत वायगावकर, ए.म.सी. चे अध्यक्ष डॉ.संतोष पांचाळ उपस्थित होते. यावेळी उपाध्यक्षपदी डॉ.आरती वाडीकर, कोषाध्यक्षपदी डॉ. शैलेश येरोळकर, सहसचिव वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्यविषयक आणि सामाजिक उपक्रमाची माहिती दिली. पर्यावरणाचा असमतोल दूर करण्यासाठी गो ग्रीन चा नारा देऊन झाडांना पाणी देऊन झाडे जगवा असा संदेश दिला. तसेच दरवर्षी बारामाही महिन्यात स्त्री विषयक सर्व रोग निदान शिबिरे, कॅन्सर विषयक जनजागृती,




नूतन पदाधिकाऱ्यांच्या पदग्रहण सोहळ्यानिमित्ताने आरोग्य परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेस भारतीय स्त्री संघटना, भारतीय स्त्री लॉप्रोस्कोपिक संघटना आणि मुंबई स्त्रीरोग संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी नूतन अध्यक्ष डॉ. सविता पदातुरे सचिव डॉ. प्राजक्ता गुरूडे पदाधिकारी यांना स्त्रीरोग संघटनेचे सेक्शुल महाराष्ट्र कमिटीचे चेअरमन डॉ.मदन कांबळे, फॅमिली वेल्फेअर कमिटी पदी डॉ.आत्तार मॅडम, डॉ. राजेश राठोड यांचीही नूतन पदग्रहण समारंभात सत्कार करण्यात आला. डॉ.स्वाती पाटील गतवर्षीच्या अध्यक्षा आणि सचिव डॉ.प्रवीण मुंदडा यांनी मागील वर्षांच्या पदावर कारभार केलाचे काम व कार्य अहवाल नुतन अध्यक्षा, सचिव यांच्याकडे हस्तांतरित केले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून नूतन सचिव व माहेर मॅटनिटी टेस्ट ट्यूब बेबी हॉस्पिटलच्या संचालिका, प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ डॉ.प्राजक्ता गुरुडे यांनी जाणीव जागृतीपर असे उपक्रम त्यांनी भारतीय स्त्री संघटनेच्या वतीनेही बारमाही राबविण्याचे यावेळी आश्वासन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रीती येरनाळे यांनी केले. तर डॉ. सुप्रिया जगताप यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी या आरोग्य परिषदेस उपस्थित असलेले डॉ.कांबळे व डॉ. जाजू मान्यवरांनी परिषदेत अत्यंत मौलिक असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी ५० डॉक्टरांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# धन्वंतरी आयुर्वेद कॉलेज,उदगीर मध्ये पदवी प्रदान समारंभ संपन्न





**उदगीर (प्रतिनिधी)** धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज व चॅरिटेबल हॉस्पिटल,उदगीर येथे शैक्षणिकवर्ष २०१८-१९ मध्ये प्रवेशित झालेल्या तथा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक अंतर्गत साडेचार वर्षाचा अभ्यासक्रम व एक वर्षाचा आंतरवासियता प्रशिक्षण कालावधी पूर्ण केलेल्या एकुण ५६ विद्यार्थी-विद्यार्थिनींचा पदवी प्रमाणपत्र वितरण-प्रदान समारंभ दिनांक:- १८/०४/२०२४ रोजी संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ,अहमदपूरचे सदस्य साहेबराव जाधव हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर लातूरचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.प्रदीप ढेले,उदगीरचे तहसीलदार राम बोरगावकर,पशुवैद्यकीय महाविद्यालय,उदगीरचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.नंदकुमार गायकवाड,धन्वंतरी आयुर्वेद कॉलेजचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय पाटील,डॉ. राजेंद्र धाटे,डॉ.अलका भंडारे,डॉ.साईराम श्रीगिरे,डॉ मंगेश मुंढे,डॉ. अविनाश जाधव हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान धन्वंतरीक्षचे प्रतिमा पूजन-स्तवन व दीप प्रज्वलनाने झाली.

या प्रसंगी बोलताना तहसीलदार राम बोरगावकर म्हणाले की वैद्यकीय व्यावसायिकानी सामाजिक नीतीमूल्यांची जपणूक करीत आरोग्य सेवा टिकवून ठेवण्यासाठी सदैव प्रयत्नशील असावे.प्रत्येकाने विविध निवडणुकीत संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार आपले राष्ट्रीय कर्तव्य समजून बजावले पाहिजे जेणेकरून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी त्याचा लाभ होईल.

याप्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले म्हणाले की वैद्यकीय क्षेत्रामधील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करताना संशोधन वृत्ती बाळगणे गरजेचे आहे.विविध चिकित्सा पद्धतीच्या पदवीधारकांनी सदैव चिंतनशील राहून आपापल्या क्षेत्रातील नवनवीन व अद्ययावत ज्ञानाचा फायदा रुग्णांना देण्यासाठी कार्यरत राहावे.

अध्यक्षीय समारोपात बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य साहेबराव जाधव म्हणाले की वैद्यकिय शाखेच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनामध्ये वैयक्तिक व्यक्तिमत्व विकासासोबतच स्वतःमध्ये समुपदेशन शैली वाढविली पाहिजे जेणेकरून रुग्ण व त्यांचे कुटुंबीय यांना विविध आजारासंबंधी माहिती देताना त्याचा उपयोग होऊ शकेल.

याप्रसंगी डॉ. नंदकुमार गायकवाड व प्राचार्य डॉ.दत्तात्रय पाटील यांची समायोचित भाषणे झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.प्रशांत बिरादार यांनी तर सूत्रसंचालन डॉ.मयुरी ठाकूर तथा आभार प्रदर्शन डॉ.नामदेव बनसोडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. गुरूराज वरनाळे,डॉ. अस्मिता भद्रे,डॉ.नमता कोरे,डॉ.शिवकांता चेटलुरे,डॉ.मधुमती चिद्रे डॉ.राधिका पाठक,डॉ पुष्पा गवळे,डॉ. रविकांत पाटील,डॉ. अमोल पटणे,डॉ. राखी वरनाळे,डॉ. रश्मी चिद्रे,डॉ.प्राजक्ता जगताप,डॉ.स्नेहलता पाटील,डॉ.चरणदास गाडेकर,डॉ.शितल घोरबांड,डॉ.शिवकुमार होटुळकर,डॉ.विष्णुकांत जाधव,डॉ.शिवकुमार मरतुळे, डॉ.उषा काळे,डॉ. रश्मी सुखदेवे,डॉ.प्रिती रोडगे तथा निओफाइट्स २०१८-१९ या शैक्षणिक वर्षी प्रवेशित विद्यार्थी-विद्यार्थिनी यांचे सहकार्य लाभले.

सदरील कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षकेत्तर-रुग्णालयीन कर्मचारी आणि तसेच प्रथम ते चतुर्थ वर्ष बी.ए.एम.एस.चे विद्यार्थी-विद्यार्थिनी व आंतरवासियता प्रशिक्षणार्थी तथा निओफाइट्स २०१८-१९ या वर्षीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे पालक व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माणुसकीचा धर्म गुरुमाउली राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराजांनी शिकविला-शि.भ.प. कु. ज्योती टाकळे





**उदगीर (प्रतिनिधी)** प्राणीमात्रावर प्रेम समर्पण करतो तोच खरा धर्म असुन माणुसकीचा धर्म गुरुमाउली राष्ट्रसत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराजांनी शिकविला असुन तो माणुसकीचा धर्म किर्तनाच्या माध्यमातून टिकवायचा, जोपासायचा व पुढे चालवायचा आहे असे विचार बाल किर्तनकार शि.भ.प. कु. ज्योती टाकळे यांनी व्यक्त केले.

ओंकारेश्वर महादेव मंदिर एस.टी.कॉलनी नळेगाव रोड नविन वसाहत मलकापुर येथे ओंकारेश्वर महिला भजनी मंडळाच्या वतीने प्रतिवर्षी प्रमाणे याहीवर्षी परमरहस्य ग्रंथाचे पारायण दि. १४ एप्रिल २०२४ पासून चालु असुन या पारायणात महिला शिवभक्तांची संख्या लक्षणीय आहे. रामनवमी निमित्त बालकिर्तनकार शि.भ.प. कु. ज्योती टाकळे यांचे कलयुगामध्ये भजन हे सार या अभंगावर किर्तनरुपी सेवा केली. कलयुगामध्ये भजन व संकिर्तनाचे महत्व आपल्या वोजस्वी वाणीतुन वेगवेगळे दृष्टांत देवून सादर केले.किर्तनासाठी सिध्दरामेश्वर महिला भजनी मंडळाने तर गणेश उमाटे या बालकिर्तनकाराने संगीताची साथ दिली. परमरहस्य ग्रंथाचा सांगता समारंभ आज शनिवार दि. २० एप्रिल २०२४ रोजी होत असुन सकाळी १० वाजता परमरहस्य ग्रंथाची मिरवणुक राष्ट्रसत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज चौक उड्डानपुल झिरो पाईंट येथुन ओंकारेश्वर महादेव मंदिक्षरापर्यंत निघाणार आहे. मिरणुकीनंतर श्रीगुरु हावगीस्वामी मठाचे मठाधिश डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्या उपस्थितीत व अशिर्वचनाने परमरहस्य ग्रंथाची महाआरती व प्रसादाने सांगता होणार आहे. पारायण यशस्वीतेसाठी ओंकारेश्वर भजनी महिला मंडळाचे सौ. वनमाला अशोक कप्ते, श्रीमती जयदेवी पोस्ते, सरुताई हलबर्गे, सुनिता कड्डे, मीना हलकुडे, छाया स्वामी, पार्वती स्वामी, सुशिला स्वामी, जगदेवी स्वामी, इंदुबाई कमठाणे, मंजु कप्ते, शालु सोनटक्के यांच्यासह महिला शिवभक्त परिश्रम घेत आहेत.